


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २४५ ■ रविवार, दि. १५ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com



# राज्यात उन्हाचा तडाखा वाढला !

## सोमवारपासून शाळांच्या वेळेत बदल

प्रतिनिधी १५ मार्च

**पुणे :** राज्यात दिवसेंदिवस उन्हाचा पारा चढत असल्याने शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ही बाब लक्षात घेऊन जिल्हा परिषद प्रशासनाने सोमवार, १६ मार्चपासून शाळांच्या वेळेत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. दुसरीकडे, राज्याच्या काही भागांत उष्णतेची लाट असतानाच विदर्भ आणि मराठवाड्यात अवकाळी पावसाचे सावट घोंघावत आहे.

शनिवारी राज्याच्या अनेक भागांत उन्हाचा पारा ३८ अंश सेल्सिअसच्या पार पोहोचला होता. दुपारच्या सत्रात वाढणाऱ्या उष्णतेमुळे विशेषतः प्राथमिक शाळेतील चिमुकले विद्यार्थी अस्वस्थ होत आहेत. अनेक ग्रामीण शाळांचे छप्पर लोखंडी पत्र्याचे असल्याने दुपारच्या वेळी वर्गात बसणे असह्य होत होते. या परिस्थितीचा विचार करून, सकाळी ९.३० ते दुपारी ४ या वेळेत भरणाऱ्या शाळा आता सकाळी ७ ते दुपारी १२.३० या वेळेत भरवण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत.

### अकोला, अमरावतीत 'हिट वेव्ह'!

राज्यातील हवामानात सध्या मोठी अस्थिरता जाणवत आहे. हवामान विभागाने १५ मार्च रोजी विसंगत हवामानाचा अंदाज वर्तवला आहे. कोकण आणि उत्तर महाराष्ट्रात उष्णतेची लाट कायम आहे. मुंबईत आर्द्रता जास्त असल्याने उकाडा जाणवेल, मात्र पावसाची शक्यता नाही. सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांना वादळी पावसाचा 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. पुण्यात हलक्या पावसाची शक्यता असून पुढील २-३ दिवस संपूर्ण मध्य महाराष्ट्रात पावसाचे वातावरण राहील. दुसरीकडे अकोला आणि अमरावतीत उष्णतेची लाट असतानाच उर्वरित विदर्भात विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज आहे. १७ ते २० मार्च दरम्यान विदर्भात गारपीट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# सिंहस्थ कुंभमेळ्यात केवळ हिंदूंनीच स्टॉल लावावेत

## इतरांचे स्टॉल उखडून टाकू - कॅबिनेट मंत्री नीतेश राणे




प्रतिनिधी १५ मार्च

**नाशिक:** नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यात केवळ हिंदूंनीच स्टॉल लावावेत. इतरांनी लावले तर ते उखडून टाका, असे प्रक्षोभक विधान राज्याचे मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास मंत्री नीतेश राणे यांनी केले आहे. त्यांच्या या विधानामुळे राज्याचे राजकारण चांगलेच तापण्याची चिन्हे आहेत.

नाशिक येथे लवकरच सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. या मेळ्याची सध्या जोरदार तयारी सुरू आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री नीतेश राणे यांनी उपरोक्त विधान केले आहे. त्यांच्या हस्ते नाशिक येथे हिंदू हित रक्षाच्यावतीने तयार करण्यात आलेल्या हिंदू व्यावसायिक कामगारांच्या सूचीचे प्रकाशन झाले. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी कुंभमेळ्यात हिंदू वगळता इतर कुणी स्टॉल लावले तर ते उखडून टाकण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, हिंदूंनी हिंदूंकडून खरेदी केली पाहिजे, ही संकल्पना ज्यांनी मांडली त्यांचे मी स्वागत करतो. मी घारघरला अशीच भूमिका मांडली. आजूबाजूला जिहादी लोकांची दुकाने होती. तेव्हा मी बोललो. त्यानंतर माध्यमांनी मला झोड-झोड झोडले. पण मला तेव्हाही काही वाटले नाही. मला आताही काही वाटत नाही. हिंदू राष्ट्रात हिंदूंबाबतच बोलायचे नाही, तर मग पाकिस्तान, इस्लामाबादवर बोलायचे का? ते आम्ही धर्माधर्मात भांडणे लावतो असे म्हणतात. ते जे बोलतात ते त्यांनी येऊन सांगावे.

### कुंभमेळ्यात एकही जिहादी येता कामा नये

नीतेश राणे म्हणाले, कुंभमेळ्याच्या निमित्ताने कुणीही हिंदूंशिवाय दुकाने लावणार नाही. सध्या रमजान सुरू आहे. त्यांच्या अन्नपदार्थांची दुकाने लागतील. तिथे एकतरी हिंदू माणूस शोधून दाखवा. एकही सापडणार नाही. त्यांच्या कुराणमध्ये असे लिहिले आहे की, काफिरांकडून काहीही घ्यायचे नाही. त्यामुळे ते तसे वागतात. मग आम्ही जे काही करतो ते त्याहून वेगळे आहे का? मी कुराम २ वेळा वाचले. १० टक्के जास्त जकात द्या असे त्यात नमूद आहे. तो पैसा जिहादसाठी वापरतात. इतरांचा धर्म कमी करून स्वतःचा धर्म वाढवावा असेही त्यात नमूद आहे. आपला पैसा लव्ह जिहादसाठी वापरला जात असेल तर ते आपण घ्यायचे का? त्यामुळे कुंभमेळ्यात एकही जिहादी येता कामा नये.

### बाहेर दुकानाचे नाव वेगळे अन् आत अब्दुल

नीतेश राणे यांनी यावेळी बोलताना पुढे म्हणाले, सध्या कुंभमेळ्याची कामे जोरात सुरू आहेत. मी तुमच्या मागण्या सरकारकडे देतो. पण सिंहस्थ कुंभमेळ्यात एकही जिहादी आला नाही पाहिजे. त्याला धाक, भीती वाटली पाहिजे. मी मागे त्र्यंबकेश्वरला गेलो होतो. तिथे दुकानावर नाव वेगळे होते, पण आतमध्ये अब्दुल बसला होता. त्यांना आता विषय कळला आहे. आम्ही आता देशभरात हिंदूंनी हिंदूंकडूनच वस्तू विकत घेण्याचा कार्यक्रम राबवणार आहोत. मी इथे आमदार किंवा मंत्री म्हणून नव्हे तर एक हिंदू म्हणून आलो आहे. कुंभमेळ्यावर लक्ष ठेवा. इथे कुणी स्टॉल लावण्यासाठी आले तर तो उखडून टाका. आम्ही वर मंत्रालयात बसलो आहोत. धर्मांतर विरोधी कायदा आणण्याची प्रक्रिया सध्या सुरू झाली आहे. आपल्या राज्यात लव्ह जिहाद विरोधात सर्वात कडक कायदा असेल, असेही नीतेश राणे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

CLASSIFIED

**प्लॉट... प्लॉट... प्लॉट**

नवीन लेआउट तपस्या नगरी
फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लॉट
-:पत्ता :-
मौजे मालेगाव , हनुमानगडी समोर , छत्री तलाव रोड
दस्तुर नगर अमरावती
अधिक माहितीसाठी संपर्क
मो. 8263923606
7757905649

**फ्लॅट फ्लॅट फ्लॅट**

नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट
अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त
१६,९९,९९९/ - मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट
पत्ता:- देसाई लेआउट ,गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8468872250
8788432278

**२ बीएचके फ्लॅट विकणे आहे**

सेकंड फ्लोअर, पूर्वमुखी, ८५० स्क्वेअर फूट, सेमी फर्निश, स्वतंत्र पार्किंग, हवेशीर प्रशस्त ४५ लाख निगोशिएबल, 'रचना पाम' वरदविनायक अपार्टमेंट, गनेडीवाल लेआऊट, क्यांम्प, अमरावती.
संपर्क
7038424614
9823077585

**सेल्समॅन पाहिजे**


सन ऑप्टिकल मध्ये ई कॉमर्स ऑपरेटर ऑप्टिकल सेल्समॅन पाहिजे...
भेटण्याची वेळ
दुपारी १२ ते ५
- संपर्क-
मो. 8888867287

**भाड्याने देणे आहे**

महिला व मुलीसाठी एक रुम बाथरुम संडास अटॅच एक दुकान १० बाय १० रोड टच भाड्याने देणे आहे.
- पत्ता-
जवाहर गेट, परकोटच्या आत साबनपुरा, अमरावती.
9403005251

# पोलीस भरती लेखी परीक्षा ; 99 टक्के उमेदवारांची उपस्थिती !

## दोन दिवसात जाहीर होणार निकाल; एसपी अर्चित चांडक यांची माहिती





### हायटेक सुरक्षा व्यवस्थेत झाली परीक्षा

प्रत्येक परीक्षा केंद्रावर उमेदवारांचे बायोमेट्रिक चेकिंग करण्यात आले. प्रत्येक वर्गात एक अधिकारी आणि चार कर्मचारी तैनात होते. तसेच, सुरक्षेसाठी प्रत्येक खोलीत दोन हॅन्डीकॅम द्वारे चित्रीकरण करण्यात आले, ज्यामुळे कुठेही गैरप्रकार झाला नसल्याचे पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्पष्ट केले.

### ॲन्सर की लवकरच आऊट करणार

लेखी परीक्षेची उत्तरतालिका आणि प्रश्नपत्रिका आज एका तासाच्या आत अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करण्यात येणार आहे. उमेदवारांना निकालाची प्रतीक्षा करण्याची गरज भासणार नाही. एसपी चांडक यांनी सांगितले की, येत्या एक ते दोन दिवसांतच लेखी परीक्षेचा निकाल जाहीर करण्याचा पोलीस प्रशासनाचा प्रयत्न आहे.

प्रतिनिधी १५ मार्च

**अकोला :** अकोला पोलीस दलातील १६१ जागांसाठी आज पार पडलेली लेखी परीक्षा यशस्वीरित्या आणि पारदर्शक वातावरणात संपन्न झाली. या परीक्षेबाबत माहिती देताना पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी समाधान व्यक्त केले असून, उमेदवारांसाठी महत्त्वपूर्ण अपडेट्स दिले आहेत. परीक्षेसाठी साधारणपणे २,३०० उमेदवार पात्र होते, त्यापैकी तब्बल ९९ टक्के पेक्षा जास्त उमेदवारांनी प्रत्यक्ष हजेरी लावली.

अकोला पोलीस दलातील पोलीस शिपायांच्या १६१ रिक्त पदांसाठीची लेखी परीक्षा आज, रविवार १५ मार्च २०२६ रोजी शहरांमधील ४ केंद्रांवर अत्यंत कडक बंदोबस्तात आणि शांततेत पार पडली. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या थेट मार्गदर्शनाखाली ही संपूर्ण प्रक्रिया राबवण्यात आली असून, कोणताही गैरप्रकार टाळण्यासाठी प्रशासनाने चोख नियोजन केले होते. मैदानी चाचणीत पात्र ठरलेल्या एकूण २,३१४ उमेदवारांचे लेखी परीक्षेसाठी नियोजन करण्यात आले होते. परीक्षा सकाळी ११ ते दुपारी १२.३० या वेळेत पार पडली. नियमानुसार उमेदवारांना २ तास आधीच केंद्रावर उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. परीक्षेदरम्यान कॉपी किंवा इतर गैरप्रकार रोखण्यासाठी सर्व केंद्रांवर कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. परीक्षेसाठी अकोला शहरातील चार प्रमुख महाविद्यालयांची निवड करण्यात आली होती. श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लक्ष्मीबाई राधाकिसन तोष्णीवाल महाविद्यालय, श्रीमती सीताबाई कला महाविद्यालय, श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय येथे परीक्षा घेण्यात आली. बाहेरगाववरून येणाऱ्या उमेदवारांची गैरसोय होऊ नये म्हणून पोलीस प्रशासनाने राहण्याची विशेष व्यवस्था केली होती. महिला उमेदवारांसाठी पोलीस लॉन येथे राहण्याची सोय केली गेली होती. तर पुरुष उमेदवारांसाठी निमवाडी मल्टिपर्पज हॉल येथे राहण्याची सोय केल्या गेली होती. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे आणि चोख नियोजनामुळे परीक्षार्थींना मोठा दिलासा मिळाला असून, भरती प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# गुढीपाडव्याला नाही तर अक्षयतृतियेला मिळणार हप्ता

प्रतिनिधी १५ मार्च



**मुंबई :** अर्थसंकल्पात राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेसाठी कोट्यवधीच्या निधीची घोषणा केली आहे. अशावेळी फेब्रुवारी आणि मार्च, या दोन महिन्यांचा लाभ एकाचवेळी देण्याचा निर्णय सरकारकडून घेण्यात आला आहे. लाडक्या बहिणींना आता फेब्रुवारी आणि मार्च हप्ता एकाच वेळी मिळणार आहे. त्यामुळे त्यांच्या खात्यात तीन हजार रुपये जमा होणार आहेत. महत्त्वाचं म्हणजे हे पैसे कधी मिळणार त्याची तारीखही समोर आली आहे. पण याबरोबरच काही महिलांचे लाभही बंद होणार आहे.

नुकताच झालेल्या अर्थसंकल्पात राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेसाठी कोट्यवधीच्या निधीची घोषणा केली आहे. अशावेळी फेब्रुवारी आणि मार्च, या दोन महिन्यांचा लाभ एकाचवेळी देण्याचा निर्णय सरकारकडून घेण्यात आला आहे. नवीन आर्थिक वर्ष सुरू होण्याआधी सरकारकडून दोन्ही महिन्यांचे हप्ते लाडक्या बहिणींच्या खात्यावर जमा केले जाणार आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, नव्या आर्थिक वर्षात फेब्रुवारी आणि मार्च या दोन महिन्यांचे पैसे जमा होणार आहेत. १५ एप्रिलच्या आधी सरकारकडून लाडक्या बहिणींच्या खात्यात ३ हजार रूपये जमा केले जातील, अशी माहिती आहे. त्यामुळे महिलांमध्ये आनंदाचं वातावरण आहे. सध्या लाडक्या बहिणींना जानेवारी महिन्यात शेवटचा हप्ता मिळाला. त्यानंतर त्यांना पैसे मिळाले नाही. पण आता दोन महिन्यांचे पैसे एकाच वेळी मिळणार आहे.

दरम्यान, याचवेळी काही महिलांचा लाभही बंद होणार आहे. राज्य सरकारकडून लाडक्या बहिणींना ईकेवायसी करण्यासाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतची मुदतवाढ देण्यात आली होती. या काळात अनेक महिलांनी ईकेवायसी केली. पण त्यामध्ये चुका झाल्या. त्यामुळेच सरकारने चुका दुरूस्त करण्याची अखेरची संधी दिली.

# लोहारा ग्रामपंचायतीत 34 लाखांचा निधी अपहार उघड

## माजी सरपंच व ग्रामसेवक सचिवांवर उरळ पोलिसांत गुन्हा

प्रतिनिधी १५ मार्च

**अकोला:** बाळापूर तालुक्यातील लोहारा ग्रामपंचायतीत तब्बल ३४ लाख रुपयांच्या निधी अपहाराचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सन २०२३ मध्ये विविध विकास योजनांसाठी मिळालेल्या निधीचा गैरवापर केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला होता. या प्रकरणी चौकशी समितीच्या अहवालानंतर माजी सरपंच आणि ग्रामसेवक सचिव यांच्याविरोधात उरळ पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेमुळे तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. लोहारा ग्रामपंचायतीत सन २०२३ मध्ये विविध विकास योजनांसाठी आलेल्या निधीचा गैरवापर करून सुमारे ३४ लाख रुपयांचा अपहार करण्यात आल्याची तक्रार ग्रामस्थांकडून करण्यात आली होती. या तक्रारीची गंभीर दखल घेतल्यानंतर आणि न्यायालयाच्या निर्देशानुसार बाळापूर पंचायत समितीकडून चौकशी समिती स्थापन करण्यात आली. या समितीने केलेल्या सखोल तपासात निधीच्या व्यवहारांमध्ये संशयास्पद नोंदी आढळून आल्याची माहिती पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. त्यानंतर पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी उरळ पोलिस स्टेशनमध्ये अधिकृत तक्रार दाखल केली.

# नागपूरमध्ये देशातील सर्वात मोठा सौर इनगॉट-वेफर प्लांट?

## ३० हजार कोटींची गुंतवणूक




प्रतिनिधी १५ मार्च

**नागपूर :** नागपूरमध्ये सौर ऊर्जा क्षेत्रातील मोठी गुंतवणूक होत आहे. वारी एनर्जी लिमिटेड कंपनीने नागपूरच्या बुटीबोरी नवीन औद्योगिक परिसरात भारतातील सर्वात मोठे १० गिगावॅट क्षमतेचे एकात्मिक सौर इनगॉट आणि वेफर उत्पादन प्रकल्प उभारणार आहे. सौर इनगॉट आणि वेफर हे सोलर पॅनल तयार करण्यासाठीचे अत्यंत महत्त्वाचे पार्ट्स आहेत. हे पार्टस आजवर चीनमधून आयात करावे लागत होते. मात्र पहिल्यांदाच त्याचे भारतात उत्पादन सुरू होत आहे. या प्रकल्पामुळे नागपुरात हजारो रोजगार निर्माण होणार असून नागपूरच्या औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार, असा दावा करण्यात येत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वारी एनर्जीज लिमिटेड कंपनीच्या 'सोलर इनगॉट आणि सोलर वेफर' उत्पादन प्रकल्पाचे भूमिपूजन शनिवारी नागपुरात पार पडले आहे. नागपूरच्या नवीन बुटीबोरी एमआयडीसीमध्ये तब्बल ३०० एकर क्षेत्रात ६,२०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून या प्रकल्पाचा पहिला टप्पा भरला जाणार आहे. हे प्रकल्प तीन एकूण टप्प्यांमध्ये पूर्ण होणार आहे. सोलर इनगॉट आणि वेफर हे सोलर पॅनलसाठी लागणारा यांत्रिक स्वरूपाचा कच्चामाल असून सध्या भारत सोलर पॅनल तयार करण्यासाठी सोलर इनगॉट आणि वेफर परदेशातून आयात करतो. मात्र हे प्रकल्प अस्तित्वात आल्यानंतर भारताचे सोलर इनगॉट आणि सोलर वेफरसाठीचे इतर देशांवरील अवलंबित्व मोठ्या प्रमाणावर कमी होईल आणि भारत सोलर पॅनल उत्पादनाच्या क्षेत्रात आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करेल. असा दावा करण्यात आला आहे.

CMYK

सिटी न्यूज अमरावती

रविवार, दि. १५ मार्च २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## 'उल्लास' साक्षरता अभियानाची परीक्षा आता २९ मार्चला; नोंदणी पूर्ण करण्याचे आदेश

**अमरावती:** केंद्र शासन पुरस्कृत 'उल्लास - नवभारत साक्षरता कार्यक्रम' अंतर्गत जिल्ह्यात होणारी पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी (FLNAT) परीक्षेच्या नियोजनात बदल करण्यात आला आहे. १५ मार्च रोजी होणारी ही परीक्षा आता रविवार, दि. २९ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत घेतली जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

जिल्ह्यात या मोहिमेअंतर्गत असाक्षरांची नोंदणी आणि पोर्टलवर त्यांचे टॅगींग करण्याचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. हे तांत्रिक काम पूर्ण करण्यासाठी आणि साक्षरता वर्गातील उमेदवारांना परीक्षेसाठी अधिक वेळ मिळावा, या उद्देशाने राज्यस्तरावरून परीक्षेचा दिनांक पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रलंबित असलेले नोंदणी व टॅगींगचे काम तातडीने पूर्ण करावे, अशा सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत. तसेच, साक्षरता वर्ग नियमितपणे सुरू ठेवून शिक्षकांनी या वर्गांना भेटी द्याव्यात आणि उमेदवारांकडून प्रश्नपत्रिकांचा सराव करून घ्यावा, असेही सांगण्यात आले आहे.

## पी.आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा

### महिला सशक्तीकरण, आरोग्य व सुरक्षिततेबाबत विद्यार्थिनींना मार्गदर्शन

प्रतिनिधी १५ मार्च

**अमरावती :** पी.आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, अमरावती येथे ८ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. दीप्ती बी. रुईकर मॅडम, प्राध्यापकवर्ग, महिला प्राध्यापक तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.




या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पोलीस निरीक्षक विजया पंधारे उपस्थित होत्या. त्यांनी महिलांच्या सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन करताना महिलांनी कायद्याची माहिती ठेवणे, आत्मविश्वासाने वागणे तसेच कोणत्याही प्रकारच्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे किती महत्त्वाचे आहे यावर भर दिला.

यानंतर डॉ. शरयू वानखेडे यांनी महिलांमध्ये आढळणाऱ्या पीसीओडी (PCOD) या सामान्य आरोग्य समस्येबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी या आजाराची कारणे, लक्षणे तसेच योग्य आहार, नियमित व्यायाम आणि जीवनशैलीतील बदलांद्वारे त्यावर नियंत्रण कसे ठेवता येते याविषयी मार्गदर्शन केले.

तसेच डॉ. प्रिया मोहोड यांनी महिलांच्या सर्वसाधारण आरोग्य समस्यांवर मार्गदर्शन केले. महिलांनी नियमित आरोग्य तपासणी करणे, संतुलित आहार घेणे तसेच मानसिक व शारीरिक आरोग्याची काळजी घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आरोग्य आणि सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण झाली. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक गौरी सालोडे, कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे संचालन श्रेया देवांग यांनी केले तर आभार प्रदर्शन गौरी सालोडे यांनी केले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना महिला हक्क, सुरक्षितता आणि समानतेचे महत्त्व समजले.

## अमरावती शहरात २२ मार्च रोजी राज्यस्तरीय बौद्ध धम्मीय वधू-वर परिचय मेळावा मोफत

प्रतिनिधी १५ मार्च

**अमरावती:** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३६ व्या जयंतीनिमित्त अमरावती येथील भीम टेकडीस्थित संबोधी संस्कार भवन येथे भव्य राज्यस्तरीय निशुल्क वधू-वर परिचय व नोंदणी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. २२ मार्च २०२६ रोजी होणाऱ्या या मेळाव्याची सविस्तर माहिती सिद्धार्थ वधू-वर सूचक केंद्राचे संचालक सिद्धार्थ दामोधरे दिनांक १४ रोजी १ वाजता जिल्हा मराठी पत्रकार भवन येथे पत्रपरिषदे आयोजन करण्यात आले होते.



अमरावती जिल्हा व परिसरातील समाजबांधवांसाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. या मेळाव्याचा मुख्य उद्देश समाजातील गरीब, शेतकरी, मजूर व कष्टकरी वर्गातील युवक-युवतींसह घटस्फोटीत व्यक्तींना योग्य जोडीदार मिळवून देणे हा आहे. सामाजिक बांधिलकी जपण्याच्या हेतूने या मेळाव्यात नाव नोंदणी पूर्णपणे मोफत ठेवण्यात आली आहे. आर्थिक परिस्थितीमुळे विवाह जमविताना येणाऱ्या अडचणी दूर व्हाव्यात, या विचारातून अमरावती शहरात या विनामूल्य उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते आणि आंबेडकरी चळवळीतील पदाधिकारी परिश्रम घेत आहेत. बौद्ध समाजातील जास्तीत जास्त विवाह इच्छुकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य आयोजक स्वप्नपूर्ती मॅरेज ब्युरो

अशोक मेश्राम, सिद्धार्थ वधु वर सुचक केंद्र अमरावती सिद्धार्थ दामोधरे यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून उद्या माहिती देण्यात येणार आहे.

## अमरावती जिल्हा उष्णतेच्या लाटेचा सामना करण्यासाठी सज्ज

### 'इन-क्रिस' प्रकल्पांतर्गत उपाययोजनांना वेग

प्रतिनिधी १५ मार्च

**अमरावती:** जिल्ह्यात वाढत्या उष्णतेच्या लाटेचे संकट आणि हवामान बदलाचा धोका लक्षात घेता, जिल्हा प्रशासन आता अधिक सतर्क झाले असून विविध प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी सज्ज झाले आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अमरावती आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने, गृह मंत्रालय, भारत सरकार, 'जीआयझेड' आणि 'आद्रा इंडिया' यांच्या सहकार्याने जिल्ह्यात 'एकात्मिक हवामान जोखीम व्यवस्थापन' (घ्ह íघ्ए) हा विशेष प्रकल्प राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश जिल्ह्यातील सर्वात असुरक्षित घटक असलेल्या शेतकरी आणि शेतमजुरांचे तीव्र उष्णतेपासून संरक्षण करणे हा आहे.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पहिल्या टप्प्यात पुसदा, यावली, शिराळा, रोहनखेड, भातकुली, खोलापूर आणि दारापूर यांसारख्या निवडक गावांमध्ये सखोल मूल्यांकन आणि अंतर विश्लेषण करण्यात आले. या प्रक्रियेत अल्पभूधारक शेतकरी, महिला शेतकरी, शेतमजूर तसेच आशा स्वयंसेविका आणि अंगणवाडी सेविकांशी थेट संवाद साधून उष्णतेचा त्यांच्या आरोग्यावर आणि उपजीविकेवर होणारा परिणाम अभ्यासण्यात आला. या अभ्यासातून समोर आलेल्या निष्कर्षांच्या आधारे, आता हा प्रकल्प प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या टप्प्यात प्रवेश करत आहे. यामध्ये प्रामुख्याने शेतकरी आणि बाहेरील कामगारांसाठी 'शितकक्ष कॉरिडॉर', विश्रांती क्षेत्रे, थंड पाण्याचे डिस्पेंसर आणि 'ग्रीन शेड' (हिरव्या सावलीची ठिकाणे) उभारली जाणार आहेत, ज्यामुळे अति तापमानात आरोग्य आणि उत्पादकता टिकवून ठेवण्यास मदत होईल. केवळ पायाभूत सुविधाच नव्हे, तर जनजागृतीवरही प्रशासनाने मोठा भर दिला आहे. 'काय करावे आणि काय करू नये' याबद्दलचे प्रशिक्षण, लिंग-विशिष्ट उष्णता असुरक्षिततेवर चर्चा आणि विविध प्रचार साहित्याद्वारे समुदायाची क्षमता बांधणी केली जाणार आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणून जिल्हाधिकारी श्री. येरेकर अध्यक्षतेखाली आरोग्य विभागाची विशेष बैठक आयोजित करण्यात येणार आहे. संपूर्ण जिल्ह्यात उष्माघाताबाबत व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. गृहनिर्माण, आरोग्य, हिरवळीची जागा आणि पाणी या क्षेत्रांमधील समन्वयातून उष्णतेशी संबंधित धोके कमी करण्यासाठी अमरावती जिल्हा प्रशासन आता पूर्णतः सज्ज झाले आहे.

## 'स्वाधार'च्या प्रलंबित अर्जांसाठी विशेष मोहीम

### त्रुटी दूर करण्यासाठी १६ मार्चपासून कार्यशाळेचे आयोजन

प्रतिनिधी १५ मार्च

**अमरावती:** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी समाज कल्याण विभागातर्फे विशेष कार्यशाळेचे आयोजन १६ ते २० मार्च २०२६ या कालावधीत दुपारी ३ ते ५ या वेळेत सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय,अमरावती येथे करण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज केवळ तांत्रिक त्रुटींमुळे किंवा कागदपत्रांच्या अपूर्ततेमुळे प्रलंबित आहेत, त्यांच्यासाठी अमरावती समाज कल्याण विभागातर्फे याकार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेमुळे विद्यार्थ्यांच्या अर्जांचा मार्ग मोकळा होणार असून, त्यांना शैक्षणिक भत्ता मिळण्यास मदत होणार आहे. शहरात उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या मोठी असते, मात्र शासकीय वसतिगृहांची प्रवेश क्षमता मर्यादित असल्याने अनेक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहतात. अशा विद्यार्थ्यांचा निवास, भोजन आणि इतर शैक्षणिक खर्च सुसह्य व्हावा यासाठी शासन 'स्वाधार' योजनेअंतर्गत थेट बँक खात्यात रक्कम जमा करते. मात्र, ऑनलाइन अर्ज भरताना उत्पन्नाचा दाखला, आधार लिंकिंग किंवा बँक खात्याच्या माहितीमध्ये झालेल्या चुकांमुळे अनेक अर्ज 'एाहू ॅ्म' (परत) केले जातात. विद्यार्थ्यांची अडचण ओळखून समाज कल्याण विभागाने ही कार्यशाळा आयोजित केली आहे. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांच्या अर्जांमधील त्रुटी जागेवरच तपासून त्या कशा दूर कराव्यात, याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन केले जाणार आहे. ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज तांत्रिक कारणास्तव रखडले आहेत, त्यांनी आपले मूळ कागदपत्रे, ऑनलाइन अर्जाची प्रत आणि लॉगिन आयडीसह या कार्यशाळेत उपस्थित राहावे, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्तांनी केले आहे. या उपक्रमामुळे पात्र विद्यार्थ्यांच्या खात्यात योजनेची रक्कम जमा होण्याची प्रक्रिया गतिमान होणार आहे.

## शहरात प्रतिबंधात्मक कलम ३७ (१) व (३) लागू

**अमरावती:** शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला आहे. सदर आदेश दि. १३ मार्च ते दि. २७ मार्चच्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी कळविले आहे.

## कौशल्य विकास केंद्राचा मंगळवारी रोजगार मेळावा

प्रतिनिधी १५ मार्च

**अमरावती:** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मोहिमे'चे मंगळवार, दि. १७ मार्च २०२६ रोजी आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर डेपो रोड, जि. अमरावती येथे हा मेळावा होणार आहे.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडल करिअर सेंटरतर्फे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्यामध्ये विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहे. जिल्ह्यातील युवकांना नोकरीच्या संधी मिळवून देण्यासाठी रोजगार मेळाव्यामधून प्रयत्न करण्यात येतो. मेळाव्यात योजनेसाठी विविध आस्थापना, कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहून उमेदवारांच्या थेट मुलाखती घेतील. मुलाखतीनंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना नोकरीची संधी मिळणार आहे.

मेळाव्यामध्ये सहभागी होण्यासाठी mahaswayamed.gov ed.in या वेबसाईटवर जाऊन ऑनलाईन नोंदणी करावी.

## आरोग्य विभागाच्या तत्परतेमुळे अतिजोखमीच्या मातेचे वाचले प्राण

### अचलपूरच्या मडकी येथील आरोग्य चमूची कामगिरी

प्रतिनिधी १५ मार्च

**अमरावती :** कर्तव्यदक्षता आणि वेळेवर घेतलेला अचूक निर्णयामुळे अचलपूर तालुक्यातील मडकी येथे जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या चमूने केलेल्या अथक परिश्रमामुळे एका अतिजोखमीच्या मातेचे आणि तिच्या नवजात बालकाचे प्राण वाचविण्यात यश आले आहे. 'मिशन २८०' अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या गृहभेटी दरम्यान गरोदर मातेच्या आरोग्याचा धोका लक्षात आल्याने ही तत्परता दाखवण्यात आली, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दिली.

मडकी येथील रहिवासी मीनाक्षी अमोल धांडे या गरोदर मातेच्या घरी आशा स्वयंसेविका आणि अंगणवाडी सेविका भेटीसाठी गेल्या असता, मातेच्या पायावर सूज असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. सुरुवातीला कुटुंबाने माहिती देण्यास टाळाटाळ केली, मात्र आरोग्य सेविकांनी तत्परतेने वैद्यकीय अधिकाऱ्यांना याची सूचना दिली. ?

डॉ. नीता निगोळे, डॉ. प्रशांत ढोके आणि प्रविणा धाकडे यांनी मातेची तपासणी केली असता, त्यांचा रक्तदाब अत्यंत धोकादायक पातळीवर असल्याचे आढळले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून आरोग्य पथकाने कुटुंबाचे सविस्तर समुपदेशन केले आणि गरोदरपणात रक्तदाब वाढल्याने उद्भवणाऱ्या जीवघेण्या धोक्यांची जाणीव करून दिली.

यावेळी मातेला तातडीने अचलपूर आणि त्यानंतर अमरावती येथील डफरिन रुग्णालयात हलविण्यात आले. डफरिन रुग्णालयात वेळेवर उपचार मिळाल्याने मातेने एका गोंडस कन्येला सुखरूप जन्म दिला. सध्या माता आणि बाळ दोन्ही सुरक्षित असून, जिल्हा प्रशासनाच्या 'सुरक्षित मातृत्व अभियाना'चे हे यश मानले जात आहे.

## मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी 'सुकन्या समृद्धी' व 'आरडी' खाते उघडा

### १६ मार्चपासून अमरावतीत विशेष मोहीम

प्रतिनिधी १५ मार्च

**अमरावती:** भारत सरकारच्या 'बेटी बचाव, बेटी पढाओ' आणि 'महिला सक्षमीकरण' अभियानांतर्गत अमरावती डाक विभागातर्फे १६ ते १८ मार्च २०२६ या कालावधीत सुकन्या समृद्धी खाते आणि 'आरडी खाते घरोघरी' ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या माध्यमातून जिल्ह्यातील शून्य ते १० वर्षे वयोगटातील मुलींचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी आणि नागरिकांमध्ये बचतीची सवय रुजवण्यासाठी डाक विभाग विशेष पुढाकार घेत आहे.

या विशेष मोहिमेअंतर्गत, पालक आपल्या १० वर्षांपर्यंतच्या मुलीचे सुकन्या समृद्धी खाते कोणत्याही नजीकच्या डाकघरात किमान २५० रुपये भरून उघडू शकतात. या योजनेवर सध्या ८.२ज्ञ् असा आकर्षक व्याजदर मिळत असून, खाते उघडण्यासाठी मुलीचा जन्म दाखला, आधार कार्ड तसेच पालकांचे आधार कार्ड व पॅन कार्ड ही कागदपत्रे आवश्यक आहेत. याशिवाय, बचतीला प्रोत्साहन देण्यासाठी किमान १०० रुपये भरून आवर्ती ठेव (आरडी) खातेही उघडता येणार आहे, ज्यावर ६.७ज्ञ् व्याजदर लागू आहे. या खात्यासाठी आधार आणि पॅन कार्ड आवश्यक असून सर्वसामान्यांनी याचा लाभ घ्यावा, असे सांगण्यात आले आहे.

या मोहिमेची व्याप्ती वाढवण्यासाठी डाक विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी प्रत्यक्ष शाळा, अंगणवाड्या आणि घरोघरी जाऊन जनजागृती करत आहेत. पालकांनी आपल्या मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी सुकन्या समृद्धी खाते उघडून एक भरीव पाऊल उचलावे आणि स्वतःसाठी बचतीची सवय लावण्यासाठी आरडी खात्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमरावती विभागाचे प्रवर अधीक्षक डाकघर पि. ए. गेडाम यांनी केले आहे.

## अचलपूर येथे अवैध गौणखनिज वाहतुकीत जप्त वाहनांचा २५ मार्च रोजी जाहीर लिलाव

प्रतिनिधी १५ मार्च

**अमरावती:** अवैध गौणखनिज उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध अचलपूर तहसील प्रशासनामार्फत गौणखनिज भरारी पथकाने विविध कारवायांमध्ये जप्त केलेली मात्र दीर्घकाळापासून दंडाची रक्कम न भरलेली १३ वाहने आता जाहीर लिलावात काढण्यात येणार आहेत. हा लिलाव येत्या २५ मार्च २०२६ रोजी दुपारी १२ वाजता तहसीलदार, अचलपूर यांच्या दालनात पार पडणार आहे.

तहसील कार्यालय, अचलपूर अंतर्गत भरारी पथकामार्फत अवैध गौणखनिज वाहतुकीवर कारवाई करून अनेक वाहने जप्त करण्यात आली होती. नियमानुसार या वाहन मालकांना दंडाची आकारणी करण्यात आली होती, परंतु अनेक गैरअर्जदारांनी अद्याप शासकीय दंडाचा भरणा केलेला नाही किंवा कोणतीही कायदेशीर कार्यवाही केलेली नाही. परिणामी, ही वाहने तहसील कार्यालयाच्या आवारात जमा आहेत. संबंधित वाहन मालकांना पत्राद्वारे दंड भरण्याची शेवटची संधी देऊनही त्यांनी प्रतिसाद न दिल्याने, अखेर या वाहनांची विल्हेवाट लावून शासकीय दंडाची वसुली करण्यासाठी लिलावाचा मार्ग अवलंबण्यात आला आहे.

या लिलावासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय , अमरावती यांच्याकडून सर्व १३ वाहनांचे तांत्रिक मूल्यांकन मागविण्यात आले होते. आरटीओकडून प्राप्त झालेल्या मूल्यांकन आणि घोषित 'हातच्या किमती'नुसार हा लिलाव केला जाणार आहे. या जाहीर लिलावात सहभागी होण्यासाठी इच्छुक व्यक्ती आणि संस्थांना प्रशासनाने आवाहन केले आहे. या प्रक्रियेमुळे शासकीय महसुलाची थकबाकी वसूल होण्यास मदत होणार असून, अवैध गौणखनिज माफियांनाही यातून कडक इशारा देण्यात आला आहे.

## उन्हाचा तडाखा वाढला, कुलर निघाले बाहेर

प्रतिनिधी १५ मार्च

**अमरावती :** होळीचा सण संपताच अमरावतीत उन्हाचा तडाखा वाढू लागला असून, अमरावतीकरांना आता कुलर्स आणि थंडावा देणाऱ्या साधनांचे वेध लागले आहेत. शहरातील तापमानाचा पारा चढायला सुरुवात होताच हमालपूरा ते रुख्मिणी मार्ग परिसर स्थित कुलर बाजार सज्ज झाला असून ग्रीन नेट आणि मातीच्या माठांच्या दुकानांमध्ये ग्राहकांची मोठी गर्दी दिसून येत आहे. उन्हाळा सुसह्य करण्यासाठी कुलर हा सर्वात महत्वाचा आधार मानला जातो. हमालपूरा येथे सध्या डेझर्ट कुलरपासून ते विविध आकारातील आधुनिक कुलर्स विक्रीसाठी उपलब्ध आहेत. केवळ नवीन कुलरच नाही, तर जुन्या कुलरच्या दुरुस्तीसाठी लागणारे साहित्य, खस आणि पंख्याच्या खरेदीसाठीही नागरिकांची पावले बाजाराकडे वळत आहेत. गेल्या दोन वर्षांत कोरोनामुळे बसलेला आर्थिक



फटका भरून काढण्यासाठी विक्रेते सज्ज आहेत. मात्र, कच्च्या मालाचे भाव वाढल्याने यंदा कुलरच्या किमतीत गेल्या वर्षीच्या तुलनेत वाढ झाली आहे. वाढत्या सिमेंटच्या रस्त्यांमुळे अमरावती शहराच्या तापमानात मोठी वाढ झाली आहे.यावर उपाय म्हणून गेल्या काही वर्षांत बाल्कनी, टेरेस आणि अंगणात ग्रीन नेट लावण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे घरातील थंडावा टिकून राहतो आणि झाडांचेही संरक्षण होते. ग्रीन नेट चे दर प्रति मिटर ८० ते ९० रुपये आहेत. पूर्वी गुजरात - दिव - दमन येथून येणारी ग्रीन नेट आता अमरावतीतच तयार होत आहे. शहरात दोन ते तीन कारखाने सुरु झाले असून, येथून आता मराठवाडा, जबलपूर आणि भोपाळला नेटचा पुरवठा केला जात आहे. उन्हाळ्याच्या या चार महिन्यांच्या काळात अमरावतीच्या बाजारपेठेत केवळ ग्रीन नेटच्या व्यवसायातून कोट्यावधी रुपयांची उलाढाल होते. यंदा मार्चच्या पहिल्याच आठवड्यापासून सुरु झालेली ही विक्री व्यापाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण तयार करणारी आहे. गुजरात येथील कृषीनेट कंपनीच्या ग्रीन नेट ला ग्राहकांची अधिकाधिक पसंती असल्याचे चित्र अमरावती येथील जवाहर रोड, मार्ग अमरावती येथील मेसर्स - विजय क्लाथ स्टोअर्स चे संचालक - दिपक कासट यांनी सांगितले आहे. यंदा संपूर्ण जगभरात अमेरिका - इराण व इजरायल या देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे ग्रीन नेटच्या भाववाढीचा फटका बसल्याने यावर्षी ग्रीन नेट च्या दरांमध्ये १० ते २० टक्के दरवाढ झाल्याची माहिती ग्रीन नेट विक्रीसाठी ठोक व किरकोळ विक्रेते म्हणून अमरावतीसह संपूर्ण विदर्भात सर्वांनाच परिचित दिपक कासट यांनी आमच्या प्रतिनिधिशी संवाद साधताना विस्तृतपणे माहिती देताना सांगितले की,

उन्हाची तीव्रता वाढत असल्याने ही उलाढाल आणखी वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. कुलर आणि नेटसोबतच मातीच्या माठांची मागणीही वाढली आहे. नैसर्गिकरित्या थंड होणाऱ्या पाण्यासाठी नागरिकांनी माठांच्या दुकानाला पसंती दिली आहे. अमरावती शहराच्या मुख्य चौकांच्या लगतच्या मार्गांवर माठाचे थर पाहायला मिळत आहेत. माठांशिवाय, मातीची सुरई, मातीची वॉटर बॉटल, पक्ष्यांसाठी जलपात्र यांची विक्री वाढली आहे.

## जिल्हा सामान्य रुग्णालयात दिव्यांगांसाठी विशेष तपासणी मोहिमेला प्रारंभ

### प्रलंबित अर्जदारांना हजर राहण्याचे आवाहन

प्रतिनिधी १५ मार्च

**अमरावती :** जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे प्रलंबित दिव्यांग अर्जांचा निपटारा करण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. ज्या दिव्यांग बांधवांनी ऑनलाईन युडीआयडी पोर्टलवर दिव्यांग प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केले आहेत, परंतु अद्याप वैद्यकीय तपासणीसाठी उपस्थित राहिलेले नाहीत, अशा सर्व अर्जदारांसाठी ही मोहीम सुरू करण्यात आली आहे.

अर्जदारांनी सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत आपले मूळ अर्ज आणि आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा सामान्य रुग्णालयात उपस्थित राहावे. ही मोहीम पुढील आदेशापर्यंत सुरू राहणार आहे, अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार यांनी दिली.

केंद्र शासनाच्या दिव्यांग अधिनियमांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, कॅन्सर, हृदयरोग, टी.बी., एचआयव्ही ग्रस्त, चर्मरोग व इतर दुर्धर आजार हे दिव्यांगत्वाच्या श्रेणीत मोडत नाहीत. त्यामुळे अशा आजारग्रस्तांनी ऑनलाईन अर्ज करू नये, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. अनेकदा माहितीअभावी असे रुग्ण अर्ज करतात आणि त्यांना आर्थिक तसेच शारीरिक त्रास सहन करावा लागतो. पात्र दिव्यांग बांधवांनी या संधीचा लाभ घेऊन आपली तपासणी पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन डॉ. पवार यांनी केले आहे.

सिटी न्यूज अकोला

रविवार, दि. १५ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अनोळखी इसम मृतावस्थेत आढळला!

**ओळख पटविण्याचे पोलिसांचे आवाहन**

**अकोला :** शहरातील मानेक टॉकज जवळील गल्लीत अंदाजे ५० वर्षी इसम १४ मार्च रोजी सकाळी १०.३० वा. मृतावस्थेत आढळून आला. याबाबत विनायक शाहीवाले रा. शिवाजीनगर जुने शहर अकोला यांनी दाखल केलल्या फिर्यादीवरून बीएनएसचे कलम १९४ नुसार रामदोस पेठ पोलिस ठाण्यात मर्ग दाखल केला आहे. सदर इसमाचे वय अंदाजे ५० ते ५५ असून, बांधा सडपातळ, वर्ण गोरा, चेहरा लांबट, उंची ५.६ फुट, केस काळे-पांढरे, उजव्या हातावर आरडीएस 'रितेश' असे गोंदलेले असून, भुरकट पांढरे मळकट शर्ट व काळ्या रंगाची जिन्स पँट आहे. अशा वर्णनाच्या इसमाची ओळख पटल्यास त्यांच्या नातेवाईकांनी किंवा ओळखीच्या लोकांनी रामदास पेठ पोलिस स्टेशन, अकोला येथे संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांच्यावतीने करण्यात आले आहे.

## अन्मेश इंगळेचा तालुकास्तरीय ॲबेकस परीक्षेत घवघवीत यश



**अकोला :** तालुकास्तरीय ॲबेकस परीक्षेत कुंभारी येथील ज्युबली इंग्लिश हायस्कूलचा विद्यार्थी अन्मेश रुपेश इंगळे याने प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अन्मेश सध्या ज्युबली इंग्लिश हायस्कूलमध्ये इयत्ता तिसरीत शिक्षण घेत आहे. ही परीक्षा अत्यंत खडतर मानली जाते. अकोला तालुक्यातील विविध शाळेमधुन अनेक विद्यार्थ्यांनी या परीक्षेत सहभाग नोंदविला होता. ५० गुणांच्या या परीक्षेत अन्मेश इंगळे याने ४६ गुण मिळवत उत्कृष्ट कामगिरी बजावली.

## अकोल्यात १९ मार्चपासून श्री चिंताहरण शिवमहापुराण कथा

**अकोला :** स्व. रामभाऊ हुसनाजी गवई व कलावतीबाई रामभाऊ गवई यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अकोला शहरात भव्य श्री चिंताहरण शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. भगवान शिवाची कृपा व आशीर्वाद प्राप्त व्हावा या भावनेतून हा आध्यात्मिक उपक्रम आयोजित करण्यात येत असून शहरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कथा श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या कथेसाठी आंतरराष्ट्रीय भागवत भूषण बालकथा व्यास पं. कृष्णाजी दुबे यांच्या अमृततुल्य वाणीतून श्री चिंताहरण शिवमहापुराणाचे कथावाचन होणार आहे. त्यांच्या प्रभावी शैलीतून भगवान शिवाचे महात्म्य, भक्ती, धर्म आणि जीवनमूल्यांबाबत भाविकांना मार्गदर्शन केले जाणार आहे.

## औद्योगिक व कामगार न्यायालय आता नव्या जागेत

**अकोला:** येथील औद्योगिक व कामगार न्यायालय दामले चौकातून आता रेल्वेस्थानक परिसरात स्थलांतरित झाले आहे.

न्यायालय पूर्वी दामले चौकातील जयंत संकुलात होते. त्याचा नवीन पत्ता औद्योगिक व कामगार न्यायालय, जिल्हा व सत्र न्यायालयाच्या पाठीमागे, बीएसएनएल कार्यालय परिसर, रेल्वेस्थानकाजवळ, अकोला असा आहे.

# हिंदूंचा स्वाभिमान जागवण्यासाठी संमेलने – ज्ञानेश्वर महाराज वाघ

प्रतिनिधी १५ मार्च

**अकोला:** कलियुगात संघटना हीच शक्ती आहे. आणि रा. स्व. संघाच्या शताब्दी निमित्त आयोजित हिंदू संमेलने हिंदूंचा स्वाभिमान जागवण्यासाठी आहेत. सज्जन माणसे सक्रिय झाली तर दुष्ट शक्ती तोंड वर काढू शकणार नाही. त्यादृष्टीने संमेलन महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन हभप ज्ञानेश्वर महाराज वाघ यांनी केले.

न्यू तापडिया नगरात गजानन महाराज मंदिराच्या प्रांगणात शनिवारी रात्री झालेल्या संमेलनात ते बोलत होते. अधिवक्ता समितीच्या ॲड. श्रुती भट, रा. स्व. संघाचे महानगर बौद्धिक प्रमुख प्रवीण




साळुंके व्यासपीठावर होते. सुरूवातीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पाहुण्यांनी पुष्पहार अर्पण केला. श्री गजानन महाराजांचे दर्शन घेतले. त्यानंतर आयोजन समिती अध्यक्ष संजय ठाकूर यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन, भारतमाता प्रतिमा पूजनाने कार्यक्रम सुरू झाला. फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली.

ॲड. श्रुती भट म्हणाल्या, धर्माधिष्ठित जीवन जगण्याची आम्हाला गरज आहे. कारण देशांतर्गत शत्रू आमच्या मुलांवर कुसंस्कार करीत आहेत. मुले व्यसनाधीन होत आहेत त्यावर संघटितपणे तोडगा काढावा लागेल. मुलींनी हित अहित लक्षात घ्यावे तसेच संकटांचा सामना करावा. विधीमंडळात धर्मांतर विरोधी विधेयक मंजूर झाल्यास

### ◆ न्यू तापडिया नगरात विशाल हिंदू संमेलन

लव्ह जिहादला आळा बसेल असा विश्वास व्यक्त केला. प्रवीण साळुंके यांनी सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण, स्वबोध आणि नागरी कर्तव्य या पंचसूत्रीला शताब्दी वर्षात केंद्रस्थानी ठेवले आहे असे सांगितले. तसेच भारतमातेला विश्वगुरूपदी विराजमान करण्यासाठी सज्जनांची सक्रियता महत्त्वाची आहे यावर भर दिला.

प्रास्ताविक कुसुमताई मसनकर, अतिथींचा परिचय हनुमान मंदिर विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष गजानन मालठणकर, गणेश वंदना प्रीती संजय ठाकूर, संचालन अभिषेक मनोज पत्की आणि सरिता पवार यांनी केले. आपला पैसा जिहादींच्या खिशात जाणार नाही या बाबतीत सजग राहण्याचे आवाहन आयोजन समितीचे अध्यक्ष संजय ठाकूर यांनी केले. आशीष मालशे यांनी वंदे मातरम् गायले. बाबासाहेब पाठक, नगरसेवक प्रशांत जोशी, निलेश देव उपस्थित होते. तर, उमेश श्रीवास्तव, प्रवीण भिवगडे, मनोज पत्की, विकास रोटकर, गणेश मैराळ, अनिल चोपडे, साहिल मालठणकर, प्रीती जयस्वाल, सृष्टी पत्की, जयश्री जोशी यांच्यासह आयोजन समितीचा पुढाकार होता.

# आधुनिकता व पारंपारिकता यांची सांगड घालून संस्कार व संस्कृती जपा-डॉ. सोनाली बलोदे

प्रतिनिधी १५ मार्च

**अकोला:** आधुनिकता व पारंपारिकता यांची सांगड घालून संस्कार व संस्कृती जपा असे आवाहन विदर्भ महिला अध्यक्ष डॉ. सोनाली बलोदे यांनी केले. कुमावत समाज विकास सेवा संस्था महाराष्ट्र राज्य आणि धन्वंतरी चिकित्सालयाच्या वतीने ८ मार्च रोजी हिंगणा रोड बलोदे-ले-आउट येथे महिला दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या.

विदर्भ महिला सचिव दिपाली बारवाल, डॉ. अनिता तिवारी, दिपा बलोदे, नैना बलोदे, दिपा गावंडे,



योगीता आंबुसकर, अतिथी नगरसेविका योगीता पावसाळे, मंगला सोनोने, उज्वला धबाले, संगीता सरतकार, उषा ठाकरे उपस्थित होत्या.

संस्कृती, संस्कार, सण उत्सव कसे व का साजरे करावे यासंबंधी मार्गदर्शन करण्यात आले. महिलांचा उत्स्फर्त प्रतिसाद मिळाला. भाविका बलोदे, सिद्धी, आंबुसकर आणि सहका-यांनी सहकार्य केले.

# जगद्गुरू प्रबोधन मंडळतर्फे सत्कार सोहळ्याचे आयोजन

प्रतिनिधी १५ मार्च

**हिवरखेड :** जगद्गुरू प्रबोधन मंडळ तेल्हारातर्फे २२ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.०० वा. भागवत मंगल कार्यालय तेल्हारा येथे अकोला जिल्ह्यातील कुणबी समाजातील नवनिर्वाचित नगरपालिका अध्यक्ष, नगरसेवक व नगरसेविकांच्या हृदयपूर्वक सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. या सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी रामेश्वरजी फुंडकर राहणार असून उदघाटक म्हणून अदिती अर्बनचे संस्थापक अध्यक्ष सुरेश देवकर राहणार आहेत. तर माजी आमदार नारायणराव गव्हाणकर, भाजप सोशल मीडिया प्रदेश संयोजक सागरदादा फुंडकर, अंदुरा ॲग्रो प्रोड्युसर कंपनी अंदुऱ्याचे संचालक प्रशांतजी वराळे (नानाभाऊ) वंचित बहुजन आघाडीचे मा. जिल्हाध्यक्ष प्रदीपजी वानखडे, अकोला काँग्रेस कमेटीचे उपाध्यक्ष प्रकाशजी वाकोडे, शिवसेना (उबाठा) जिल्हाध्यक्ष गोपालभाऊ दातकर, भाजप जिल्हाध्यक्ष संतोषजी शिवरकर, कुणबी समाज विकास मंडळ अकोला अध्यक्ष डॉ. बाबुरावजी शेळके, अ. भा. कुणबी समाज मंडळ अकोला प्र. अध्यक्ष प्रशांत आढे (राजुभाऊ) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी हिवरखेडच्या नगराध्यक्षा सौ. सुलभाताई दुतोंडे, अकोल्याच्या नगरसेविका श्रीमती मंजुषाताई शेळके, अकोटच्या नगरसेविका सौ. सुनिताताई महाले, तेल्हाऱ्याच्या महिला व बालकल्याण उपसभापती सौ. रुपालीताई हागे हिवरखेडच्या महिला व बालकल्याण उपसभापती सौ. अनिताताई वाकोडे, तेल्हाऱ्याच्या नगरसेविका सौ. कन्होपात्राताई फाटकर, सौ. अरुणाताई ठाकरे, हिवरखेडच्या नगरसेविका सौ. दिपालीताई इंगळे, तेल्हाऱ्याचे नगरसेवक कैलासजी ठोकणे, गजाननराव गायकवाड, हिवरखेडचे नगरसेवक रवी (राणा) घुंगड, ऋषिकेश पंचबुद्धे यांच्यासह कुणबी समाज संघटना तालुका अध्यक्ष शाम गावंडे, तेल्हारा शहराध्यक्ष वैभव तायडे, महिला संघटना तालुका अध्यक्ष सौ. सुमनताई कोठे व तेल्हारा शहराध्यक्ष सौ. आरतीताई गायकवाड यांचा सुद्धा सत्कार करण्यात येणार आहे.तर अकोल्याचे नगरसेवक पराग गवई यांचा सत्कार होणार आहे.यावेळी सौ. संध्याताई वाघोडे, सौ. शोभाताई शेळके, सौ. जयश्रीताई लांडे, सौ. जयश्रीताई घंगाळ, शंकरराव खुमकर, शंकरराव पुंडकर गुरुजी उपस्थित राहतील. सकल कुणबी समाज बंधू आणि भगिनींनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन जगद्गुरू प्रबोधन मंडळाचे अध्यक्ष महेंद्र कराळे यांनी केले आहे

# विविध स्पर्धा व उपक्रमांनी पाटील समाज महिला मंडळाचा मेळावा

प्रतिनिधी १५ मार्च

**अकोला:** पाटील समाज महिला मंडळाच्या वतीने स्थानिक मराठा सेवा संघाच्या सभागृहात महिला दिनानिमित्त मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी डॉ. उज्वला मापारी होत्या. प्रमुख अतिथी म्हणून नगरसेविका सुरेखा काळे, डॉ. वंदना मोरे, अपर्णा पाटील, डॉ. सीमा तायडे, डॉ. दिपाली काळे, प्रमिला भिसे, प्रतिभा पाथ्रीकर, पाटील समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा वैशाली बहाकर, सचिव ॲड. दिपाली जानोरकर, कार्याध्यक्षा रूपाली नाकट, जिल्हा संघटिका सरिता वाकोडे उपस्थित होत्या.

प्रारंभी राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्य रक्षक संभाजी राजे यांच्या प्रतिमांचे



अतिथींच्या हस्ते पूजन करण्यात येऊन दीप प्रज्वलन करण्यात आले. प्रियंका पोटे यांनी गणेश वंदना सादर केली. सोयरा अंधारे या बालिकेने जिजाऊंच्या पोवाडया सह स्वागत गीत गायीले.

ॲड. दिपाली जानोरकर यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षा वैशाली बहाकर यांनी मंडळातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. महिला मंडळाच्या पदाधिकारी अर्चना पाटील, सोनाली मोरे, वर्षा पोरे, संगीता दाळू, स्वाती बारबदे, संगीता ताथोड, संगीता वानखडे, राधा राऊत, रेणुका पात्रीकर, सुमित्रा काकड, वनमाला ठाकरे, जयश्री राऊत यांनी अतिथींचे स्वागत केले.

डॉ. सीमा तायडे यांनी महिलांनी आरोग्य कसे जपावे याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. वंदनाताई मोरे यांनी महिलांनी आपल्या नित्य घर कामासोबतच एखादी कला अवगत करण्यासाठी ही प्रयत्न करावा असे आवाहन केले. डॉ. दिपाली काळे, प्रमिला भिसे, नगरसेविका सुरेखा काळे, सरिता वाकोडे, रूपाली नाकट यांनीही याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करून विविध विषयांवर महिलांना मार्गदर्शन केले.

समाजात विविध उपक्रम राबवून एक आदर्श निर्माण करीत असल्याबद्दल गौरी पारस्कर, माधुरी अढाऊ, प्रांजल रायपुरे, वैष्णवी गावंडे, वर्षा जायले, वृंदा काटकर, उमा वक्ते, भक्ती भटकर यांचा मानपत्र व सन्मान चिन्ह देऊन अतिथींच्या हस्ते गौरविण्यात आले. मेळाव्यानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये विजयी झाल्याबद्दल माधुरी अढाऊ, वर्षा बारड, ममता भडांगे, प्रियंका पोटे, वृंदा कोरपे, संगीता राऊत, अर्चना आढाव, मीनल गोंडचवर यांना अतिथींच्या हस्ते पुरस्कार देण्यात आलेत. कार्यक्रमाचे संचालन वर्षा शिंदे व सोनाली मोरे यांनी केले. आभार प्रदर्शन अर्चनाताई पाटील यांनी केले.

# कौटुंबीक न्यायालयात १४ प्रकरणात समेट

प्रतिनिधी १५ मार्च

**अकोला:** येथे राष्ट्रीय लोक अदालतचे आयोजन करण्यात आले होते. या न्यायालयातील प्रलंबित प्रकरणापैकी एकूण ३५ प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतमध्ये तडजोडीकरीता ठेवण्यात आली होती. त्यापैकी १४ प्रलंबित प्रकरणात समेट घडुन आल्यामुळे ती प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामध्ये मुख्यत्वे वैवाहिक वाद स्वरूपाची तसेच खावटीची, घटस्फोटाची तसेच अज्ञान मुलांच्या ताब्याबाबतच्या प्रकरणात तडजोड. तसेच प्रकरणातील पती पत्नी व त्यांची मुले याबाबत तडजोड करुन आपसी सहमतीने घटस्फोट घेणारे पती-पत्नी नांदण्याकरिता गेले. त्यामध्ये महत्वाची बाब म्हणजे एका प्रकरणातील जोडपे वयस्कर होते. लोक न्यायालयाच्या माध्यमातून त्या



दांपत्याने एकत्र राहण्याचा निर्णय घेतला.

लोक न्यायालय यशस्वी होण्याकरीता प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. डी. क्षीरसागर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव डी. एस. दाभाडे यांचे बहुमुल्य मार्गदर्शन लाभले. तसेच कौटुंबिक न्यायालयाच्या न्यायाधीश श्रीमती आय. जे. नंदा, पॅनल वरील न्यायाधीश श्रीमती एस. एस. जांभळे, सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, अकोला तसेच श्रीमती एस. एन. गांजरे विवाह समुपदेशक, विधीज्ञ श्रीमती एल. बी. दांदळे तसेच कौटुंबिक न्यायालयीन प्रबंधक श्रीमती आर. बी. डिगंबर, श्रीमती व्ही. व्ही. हुशारे, आर. आर. गोंडचवर, एन. व्ही. आवंडेकर, ए. एस. मलकापुरकर, तसेच वकीलांचे योगदान लाभले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे कर्मचारी, विधी स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले. लोक अदालत यशस्वीतेसाठी अकोला बार असोसिएशन तसेच पोलिस अधीक्षक कार्यालयाचे सहकार्य लाभले अशी माहिती कौटुंबिक न्यायालयाच्या प्रबंधक श्रीमती आर. बी. डिगंबर यांनी दिली.

# शेतीच्या वादावरुन खून करणाऱ्या दोघांचा जमानत अर्ज न्यायालयाने फेटाळला

प्रतिनिधी १५ मार्च

**अकोट:** अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश बी.एम. पाटील यांनी अकोट ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत देऊळगाव येथील आरोपी सुरेश बापुराव गहले व शुभम सुरेश गहले दोघेही राहणार यांनी शेतीच्या वादावरुन लोखंडी पाईप व कु-हाडीने खुन केल्याच्या प्रकरणात दाखल केलेला आरोपीचा जमानत अर्ज दोषारोप पत्र न्यायालयात दाखल झाल्यानंतर नामंजूर केला आहे. दोन्ही आरोपी या प्रकरणात अकोला कारागृहात २५.०७.२०२३ पासुन बंदिस्त आहेत.

या प्रकरणात सरकारी वकील अजित देशमुख यांनी जमानत अर्जाला विरोध करताना युक्तीवाद सादर केला. फिर्यादी अर्चना ज्ञानेश्वर गहले यांनी पोलिस स्टेशनला त्यांचा भाचा परेश गजानन सदार, रा. पिंपळोद सह जबानी रिपोर्ट दिला. चार एकर शेतीच्या वहिती वरुन पतीचा जेठासोबत वाद होता. त्यामुळे जेठ सुरेश गहले यांनी व त्यांचा मुलगा शुभम गहले यांनी पतीला बरेच वेळा जीवाने मारण्याच्या धमक्या दिल्या होत्या. २३/०७/२०२३ रोजी दुपारी ०१.३० वा सुमारास त्यांचे पती ज्ञानेश्वर गहले सास-याच्या नावे असलेल्या शेतात कपाशीवर फवारणी करिता गेले होते. दुपारी ०४.३० वा दरम्यान त्यांचे चुलत दिर अनिल दामोदर गहले यांचा मुलगा प्रणव याल फोन आला की, ठतुझे वडील ज्ञानेश्वर गहले तुमच्या शेतात जखमी अवस्थेत पडलेले आहेत. मुलगा प्रणव यांचेसह मोटरसायकलने शेताचे दिशेने गेले. ज्ञानेश्वर गहले हे जख्मी अवस्थेत पडलेले दिसले. त्यांचा भाऊ सुरेश गहले व पुतण्या शुभम गहले यांनी शेतीचे वादावरून लोखंडी पाईपाने व कु-हाडीने मारहाण करून गंभीर जखमी केल्याचे सांगितले. प्रणव व त्यांनी त्यांचे पतीला शिवम मोहोड यांच्या फोरव्हिलर गाडीने अकोट येथील व्यवहारे डॉक्टरकडे नेले. पेशंट सिरीयस आहे ताबडतोब अकोला येथे घेवून जा असे सांगितल्याने त्यांना अकोला येथे हलवले. उपचारा दरम्यान रात्री ९.०० वा. दरम्यान मरण पावले. फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून आरोपींविरुध्द कलम ३०२,३४ प्रमाणे अकोट ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. तेव्हा च्या सहा.पो. अधीक्षक रितु खोखर यांनी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केला. गुन्हयाचे तपासामध्ये आरोपी सुरेश बापूराव गहले, शुभम सुरेश गहले यांचा जामीन अर्ज मंजूर केला, तर ते साक्षीदारांवर दबाव आणू शकतात, केस चालविण्यात अडथळे निर्माण करू शकतात व साक्षीदारांना साक्ष देण्यापासून प्रावृत्त देखील करू शकतात. त्यामुळे आरोपींनी दाखल केलेला जामीन अर्ज खारीज करावा. सरकारी वकील अजित देशमुख व दोन्ही पक्षाच्या युक्तीवादानंतर कोर्टाने आरोपीचा जमानत अर्ज नामंजूर केला.

# एसटी कार्यालयात कार्यरत महिलांचा सत्कार

### ◆ रोटरी क्लब अकोट व्हिजन चा महिला दिनानिमित्त उपक्रम

प्रतिनिधी १५ मार्च

**अकोट:** जागतिक महिला दिना चे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ अकोट व्हिजन च्या वतीने एसटी महामंडळामध्ये कार्यरत महिलांचा सत्काराचे आयोजन अकोट येथे करण्यात आले होते. रात्रंदिवस घराचा संसार सांभाळून लाल परी च्या माध्यमातून प्रवाशांची सेवा करण्याचे कार्य या महिला करीत असतात. अशा धाडसपूर्ण कार्य करीत असताना ते आपली जबाबदारी यशस्वीतेने पार पाडतात. त्यांच्या या कार्याला आमचा सलाम. आम्ही त्यांना मानाचा मुजरा करतो. अशा या महिलांचा आज आम्ही सत्कार करीत आहोत असे रोटरी क्लब ऑफ अकोट विजन आनंद भोरे यांनी कार्यक्रमाचे संचालन करताना सागीतले.तर या प्रसंगी आपले विचार व्यक्त करताना बसमध्ये असलेली अवाजवी गर्दी आणि चालू बसमध्ये तिकीट बुकिंग चे कार्य असे एक महत्त्वपूर्ण कार्य




करण्याचे धाडस या वाहक महिला करीत असतात त्यांना शासनाने काही नियम लावून सुरक्षित करावे असे आवाहन कार्यक्रमाचे अतिथी नंदकिशोर शेगोकार यांनी केले तर महामंडळाची अशी ही भारी भर कम ड्युटी करून महिला वाहक लाल परीचे माध्यमातून सेवा करतात त्यांचा सत्कार म्हणजे त्यांना या कार्यासाठी प्रोत्साहन आहे रोटरी क्लब ने राबविलेल्या या उपक्रमाचे भरपूर आभार असे वक्तव्य कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आगार व्यवस्थापक पिसोडे यांनी केले .महिला वाहक रस्त्यावर बस मध्ये चालतात तेव्हा त्यांना चांगले आणि वाईट दोन्ही अनुभव येतात तरी त्या न घाबरता आपले कार्य जबाबदारीने पूर्ण करतात आणि महामंडळाचे नाव लौकिक करतात असे गौरवपूर्ण उद्गार आकोट आगाराचे प्रभुदास तळोकार यांनी व्यक्त केले .या कार्यक्रमात सर्व महिला कर्मचाऱ्यांना एक मोमेंटो आणि भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला यात्रसंगी मंचावर आनंद भोरे,प्रमुख आगार व्यवस्थापक पिसोडे ,रोटरी नंदकिशोर शेगोकार, आगार चे प्रभुदास तळोकार, अतुल मालानी, अध्यायाच्या प्रथम महिला अर्चनाताई भोरे, विजय भोरे उपस्थित होते. तर प्रास्ताविक संदीप भुस्कट यांनी तर आभार अतुल मालानी यांनी मानले.

सत्कार नंतर काही वाहक महीला कर्मचार्यांनी आपले अनुभव देत रोटरी क्लब ऑफ अकोट विजन चे आभार मानले पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते

# इंधन टंचाईत 'बळीराजा' चा आदर्श

### ◆ बैलगाडीतून तूर आणणाऱ्या शेतकऱ्याचा गौरव



प्रतिनिधी १५ मार्च

**आलेगाव :** सध्या भासणारी पेट्रोल आणि डिझेलची टंचाई आणि वाढत्या महागाईवर मात करण्यासाठी येथील एका जागरूक शेतकऱ्याने आधुनिक यंत्रांच्या मागे न धावता पारंपरिक साधनांचा वापर केला. शेतकरी समाधान बोरकर यांनी तूर विक्रीसाठी बैलगाडीतून 'शत्रुंजय मॉडेल नाफेड खरेदी केंद्रावर' आणली. त्यांचा सन्मान करण्यात आला.

वाहतुकीसाठी ट्रॅक्टर किंवा इतर इंधनचलित वाहनांचा वापर न करता बोरकर यांनी बैलगाडीचा पर्याय निवडला. खरेदी केंद्राचे संचालक अक्षय जैन यांनी समाधान बोरकर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

अक्षय जैन यांनी सर्व शेतकरी बांधवांना आवाहन केले की, ठजे शेतकरी आपला शेतमाल (तूर) बैलगाडीने खरेदी केंद्रावर आणतील, त्यांना काट्यावर मोजणीसाठी तासनतास रांगेत उभे राहण्याची गरज भासणार नाही. अशा शेतकऱ्यांचा शेतमाल प्राधान्याने आणि थेट मोजून घेतला जाईल. गावातील मान्यवर आणि प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. १५ मार्च २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# धारदार शस्त्राने वार करून तरुणाची निर्घृण हत्या

प्रतिनिधी १५ मार्च



**यवतमाळ :** जिल्ह्यात खुनांच्या घटना वाढत असतानाच आणखी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. लासीना रेल्वे क्रॉसिंगजवळ अज्ञात व्यक्तींनी धारदार शस्त्राने सपासप वार करून एका तरुणाची निर्घृण हत्या केल्याची घटना रविवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

आतीश सुभाष देशमुख (वय ३५) असे मृत तरुणाचे नाव असून तो पिंपळगाव येथील बालाजी मंगल कार्यालयाजवळ राहणारा होता. मिळालेल्या माहितीनुसार, आतीश देशमुख हा शनिवारी रात्री सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास दुचाकीने घरातून बाहेर पडला होता. मात्र रात्री उशिरापर्यंत तो घरी परतला नाही. त्यामुळे चिंताग्रस्त झालेल्या नातेवाईकांनी पोलीस ठाण्यात जाऊन याबाबत माहिती दिली होती. दरम्यान रविवारी सकाळी यवतमाळ–अमरावती मार्गावरील लासीना रेल्वे क्रॉसिंगजवळ एका तरुणाचा मृतदेह आढळून आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. घटनास्थळी पोहोचल्यावर मृतदेहाची ओळख आतीश देशमुख अशी पटली. प्राथमिक तपासात हल्लेखोरांनी प्रथम त्याच्या डोळ्यांत मिरची पूड टाकून त्याला असहाय केले. त्यानंतर धारदार शस्त्राने पोट, मान तसेच शरीराच्या इतर भागांवर सपासप वार करून त्याची हत्या केल्याचे समोर आले आहे. घटनेची माहिती मिळताच लाडखेड पोलीस ठाण्याचे पथक, स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ फॉरेन्सिक लॅब तसेच नेर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात पाठविला आहे. दरम्यान, यवतमाळ जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांत तीन खुनांच्या घटना घडल्याने कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. आतीश देशमुख याची हत्या नेमकी कोणी आणि कोणत्या कारणावरून केली, याचा उलगडा अद्याप झालेला नाही. या प्रकरणी पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# जंगलातील आग विझवताना जखमी झालेल्या वनकर्मचाऱ्याचा मृत्यू




प्रतिनिधी १५ मार्च

**यवतमाळ :** हिवरी वनपरिक्षेत्रातील मनपूर येथे लागलेल्या जंगलातील आगीवर नियंत्रण मिळवण्याच्या प्रयत्नात गंभीर जखमी झालेल्या क्षेत्र सहाय्यक विजय सिंगणजुडे यांचे शनिवारी (१४ मार्च) उपचारादरम्यान निधन झाले. कर्तव्य बजावताना प्राण गमावल्याने वनविभागात हळहळ व्यक्त होत आहे.



मृतक विजय सिंगणजुडे

मनपूर वर्तुळातील नियतक्षेत्र मनपूर, कक्ष क्रमांक ४९५ येथे ६ मार्च रोजी भीषण जंगलातील आग लागली होती. आग विझवण्यासाठी वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी प्रयत्न करत असताना क्षेत्र सहाय्यक विजय सिंगणजुडे हे गंभीररीत्या भाजले.

जखमी अवस्थेत त्यांना प्रथम यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. पुढील उपचारासाठी त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील बेंबडे रुग्णालयात हलविण्यात आले होते. तेथे डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू होते. उपचारांना सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याने त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याचे सांगितले जात होते.

मात्र शनिवारी दुपारी साडेबारा ते पावणेएकच्या सुमारास त्यांना अचानक श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. त्यानंतर त्यांचे हृदय कार्य बंद पडले. डॉक्टरांनी उपचाराचे प्रयत्न केले; मात्र त्यांना वाचवता आले नाही.

कर्तव्य बजावताना प्राण गमावलेल्या सिंगणजुडे यांच्या निधनामुळे वनविभागातील कर्मचारी व सहकाऱ्यांमध्ये शोककळा पसरली असून त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# नाफेडच्या नावाखाली शेतकऱ्यांची लूट; प्रत्येक क्विंटलवर २–५ किलोची 'कट्टी'

## शेतकऱ्यांमध्ये संताप उफाळला

प्रतिनिधी १५ मार्च

**उमरखेड :** तालुक्यातील शेतकरी आधीच अस्मानी व सुलतानी संकटाने होरपळला असताना, आता हक्काच्या हमीभाव केंद्रांवरही त्यांची लूट होत असल्याचे संतप्त प्रकार समोर आले आहेत. उमरखेडमधील काही खाजगी नाफेड खरेदी केंद्रांवर तूर आणि हरभरा खरेदी करताना प्रत्येक क्विंटलवर २ ते ५ किलोची अवैध 'कट्टी' (वजावट) लावली जात असल्याचे शेतकऱ्यांनी तक्रार केली आहे.

शासकीय नियमांनुसार हमीभाव केंद्रावर शेतकऱ्यांच्या मालाचे अचूक वजन होणे आवश्यक आहे. मात्र, 'बारदाना', माती, मॉइश्चर किंवा 'डॅमेज' अशा कारणांचा आधार घेत केंद्रांवरून प्रत्येक क्विंटल मागे २ ते ५ किलो माल कापला जात आहे. एका क्विंटलवरील ५ किलोपर्यंतची ही कट्टी शेतकऱ्यांचे हजारो रुपयांचे नुकसान करत आहे. तक्रार करणाऱ्या शेतकऱ्यांचा माल नाकारला जात असल्याने शेतकरी हा अन्याय सहन करीत आहेत.

या गैरप्रकारावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी तालुका दक्षता समितीची असली, तरी डोळ्यादेखत शेतकऱ्यांची लूट सुरू असताना समिती सुस्त असल्याचा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. खाजगी केंद्र चालकांच्या मनमानी कारभारामुळे 'नाफेड'च्या मूळ उद्देशालाही हरताळ फासला जात आहे.

तालुका प्रशासनाने भरारी पथकाची नियुक्ती करून सर्व खाजगी खरेदी केंद्रांची अचानक तपासणी करावी. उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि तालुका उपनिबंधकांनी सीसीटीव्ही फुटेजसह केंद्रांची चौकशी केली तर सत्य बाहेर येईल.

जर ही बेकायदेशीर कट्टी तात्काळ थांबली नाही, तर शेतकरी आक्रमक पवित्रा घेण्याच्या तयारीत आहेत. आता निर्णय तालुका प्रशासनाच्या कोर्टात असून, न्याय शेतकऱ्यांना मिळेल की केंद्रचालकांना, हे पाहण्यास सर्वांचे लक्ष लागले आहे.

# निम्न पैनगंगा प्रकल्पावरून शेतकरी आक्रमक

प्रतिनिधी १५ मार्च

**यवतमाळ :** आर्णी तालुक्यातील खडका येथे सुरू असलेल्या निम्न पैनगंगा सिंचन प्रकल्पाच्या कामावरून शेतकरी संघटना आक्रमक झाल्या आहेत. प्रकल्पासंदर्भातील आवश्यक कागदपत्रे व माहिती प्रशासनाने अद्याप उपलब्ध करून दिली नसल्याचा आरोप करत राष्ट्रीय किसान मोर्चा व निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समितीने राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

संघटनांच्या म्हणण्यानुसार, 7 जानेवारी 2026 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे SIA अहवाल, DPR मंजुरी तसेच LARR Act 2013 नुसार भूसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्रक्रियेची माहिती




मागविण्यात आली होती. मात्र दोन महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही प्रशासनाकडून कोणतेही उत्तर मिळाले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या भूमिकेविषयी नाराजी व्यक्त करण्यात आली. प्रशासनाच्या निष्क्रियतेचा निषेध नोंदवत संघटनांनी टप्प्याटप्प्याने आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. त्यानुसार 13 ते 15 मार्चदरम्यान राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांवर निवेदन देण्यात येणार आहे.

23 मार्च रोजी जिल्हानिहाय निषेध रॅली व आंदोलन करण्यात येणार असून 10 एप्रिल रोजी आर्णी येथील दिग्रस रोड बायपासवरील राष्ट्रीय महामार्ग 361 वर रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. तसेच 23 एप्रिल रोजी महाराष्ट्र बंद आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

ही आंदोलने भारतीय संविधानाच्या कलम 19(1) अंतर्गत लोकशाही मार्गाने केली जाणार असल्याचे संघटनांनी स्पष्ट केले.

यावेळी भुवन मुनेश्वर (जिल्हा प्रचारक, राष्ट्रीय किसान मोर्चा), सुनील गवई (जिल्हाध्यक्ष, भारत मुक्ती मोर्चा), बिमोद मुधाने (लोकसभा प्रभारी, बहुजन मुक्ती पार्टी) यांच्यासह मधुकर हटकरे, गजानन गोडवे, विलास भोयर, प्रकाश वावरे आणि इतर शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# महामार्गावर वाहनतपासणीवरून खासदार आष्टीकर संतापले

## प्रवाशांना नाहक अडवू नका; वाहतूक पोलिसांना दिला इशारा

प्रतिनिधी १५ मार्च

**उमरखेड :** शहरालगतच्या नागपूर–तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर वाहनतपासणीच्या नावाखाली प्रवाशांच्या गाड्या वारंवार अडवून त्रास दिला जात असल्याच्या तक्रारी वाढत असताना हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी वाहतूक पोलिसांना चांगलेच धारेवर धरले. गुरुवारी (दि. १३) त्यांनी स्वतः रस्त्यावर थांबून वाहतूक कर्मचाऱ्यांना जाब विचारला.

शहरातील वाहतूक व्यवस्था आधीच विस्कळीत असताना वाहतूक शाखेचे केवळ एक-दोन कर्मचारी शहरात कर्तव्य बजावताना दिसतात. उर्वरित सहा ते सात कर्मचारी

### महामार्गावर अवैध प्रवासी वाहतुकीवर लक्ष

■ "शहरातील विविध चौकांमध्ये वाहतूक शाखेचे कर्मचारी कर्तव्य बजावत असतात. काही कर्मचारी शहराबाहेरील राष्ट्रीय महामार्गावर अवैध प्रवासी वाहतूक किंवा एका वाहनात अतिरिक्त प्रवासी आहेत का, याची तपासणी करतात. तसेच दररोज कर्मचारी महामार्गावर उभे नसतात. उद्यापासून राष्ट्रीय महामार्गावर कर्मचारी उभे राहणार नाहीत," अशी माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल गुंडे यांनी दिली.

शहरालगतच्या नांदेड रोडवरील नागपूर–तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर उभे राहून वाहनांची तपासणी करत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे प्रवाशांना अनावश्यक अडथळे निर्माण होत असून वाहतुकीची कोंडी होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून होत असल्याचे खासदारांनी सांगितले.

दरम्यान, काही प्रवाशांनी वाहनतपासणीच्या नावाखाली अतिरिक्त वसुली होत असल्याचेही आरोप केले. ही बाब लक्षात येताच खासदार आष्टीकर यांनी स्वतः वाहन थांबवून वाहतूक कर्मचाऱ्यांना याबाबत जाब विचारला. तसेच वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल गुंडे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून नागरिकांना होत असलेल्या त्रासाची माहिती दिली. "जर वाहनतपासणीची मोहीम राबवायची असेल तर ती



आठवड्यातून एखाद्या दिवशी घ्या. दररोज महामार्गावर प्रवाशांच्या गाड्या अडवून त्रास देणे योग्य नाही. उद्यापासून राष्ट्रीय महामार्गावर गाड्या अडवणे बंद करा," असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला.

उमरखेड शहरात अवैध प्रवासी वाहतूक सुरू असताना आणि शहरातील वाहतूक व्यवस्था विस्कळीत असताना वाहतूक शाखेचे कर्मचारी महामार्गावर नेमके काय करत आहेत, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. या प्रकरणाकडे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# बहुजन नायक विचारमंचतर्फे निबंधलेखन परीक्षा

प्रतिनिधी १५ मार्च

**यवतमाळ :** बहुजन नायक विचारमंच, आयरन लेडी स्पोर्टिंग क्लब व बिरसा -शिवाजी - आंबेडकर ब्रिगेड चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने बामसेफ, दलीत शोषित संघर्ष समिती (डीएसफोर), बहुजन समाज पार्टी व बुद्धिष्ट रिसर्च सेंटर (बीआरसी) चे जनक बहुजन नायक मान्यवर कांशीराम यांच्या 92 व्या जयंती अर्थात सामाजिक परिवर्तन दिनानिमित्त शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विदर्भस्तरीय निबंधलेखन स्पर्धा परीक्षा आयोजित करण्यात आली आहे.

'बहुजन चळवळीचा संघर्षमय इतिहास आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर ,कांशीराम व मायावती यांचे सामाजिक, शैक्षणिक,राजकीय व राष्ट्रीय क्षेत्रातील योगदान' हा या निबंध स्पर्धेचा विषय आहे. निबंध शब्दमर्यादा 250 ते 350 असून स्वहस्तलिखित असावा.

या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना भारतीय संविधान, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

या निबंध स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपला निबंध दिनांक 31 मार्च 2026 पर्यंत पोस्टद्वारे बंद लिफाफ्यात 'भरत कुमार, 11A श्रीअष्टविनायक अपार्टमेंट, हवेली गार्डन, रामनगर,चंद्रपूर 442401' या पत्त्यावर पाठवावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# महाराजस्व समाधान शिबिरात पालकमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांची भेट; नागरिकांना विविध लाभांचे वाटप

प्रतिनिधी १५ मार्च



**यवतमाळ :** राज्य शासनाच्या महसूल विभाग आणि जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्ह्यात ७ मार्चपासून राबविण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाचा दुसरा टप्पा १४ मार्च रोजी सर्व तालुक्यात उत्साहात पार पडला.

या अभियानांतर्गत नेर तालुक्यातील मोझर येथे आयोजित शिबिराला पालकमंत्री ना. संजय राठोड आणि जिल्हाधिकारी विकास मीना यांनी भेट देऊन लाभार्थ्यांना विविध शासकीय योजना आणि लाभांचे वाटप केले. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महसूल विभागाशी संबंधित अनेक प्रश्नांची त्वरित सोडवणूक केली.

शिबिरादरम्यान नागरिकांना शासनाच्या विविध योजना, नवीन कायद्यांबाबत मार्गदर्शन देखील देण्यात आले. यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या सुविधा आणि लाभ सहज मिळू शकतील.

यावेळी जिल्हाधिकारी विकास मीना, विविध विभागाचे अधिकारी-कर्मचारी आणि मोझर मंडळ परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिराचे आयोजन नागरिकांच्या प्रशासनाशी थेट संवाद साधण्यासाठी आणि सेवा सुलभ करण्यासाठी करण्यात आले होते.

# यशस्विनी संस्थेतर्फे कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

प्रतिनिधी १५ मार्च

**यवतमाळ :** यशस्विनी सामाजिक संस्था आणि यशस्विनी योगा ग्रुप यांच्या वतीने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. अध्यक्ष उज्वला कांबळे होत्या, तर प्रमुख वक्ते कुंदा तोडकर यांनी महिलांची कौटुंबिक आणि सामाजिक जबाबदारी यावर मार्गदर्शन केले.



प्रमुख अतिथी प्रियदर्शनी उईके (नगराध्यक्ष) यांनी महिला प्रगतीवर प्रकाश टाकला. डॉ. अंजली गवार्ले यांनी महिला आरोग्य, पाइल्स व फिशर या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच डॉ. कीरण वट्टी यांनी कॅन्सर विषयक माहिती दिली. डॉ. स्नेहल राऊत, नागपूर, जया काळे (प्रशासकीय अधिकारी), नगरसेविका स्वाती खंडारे, मीरा विर नगरसेविका,माधुरी वाळवे उपस्थित होत्या.तर यशस्विनी योगा ग्रुपच्या अध्यक्षा पल्लवी कांबळे यांनी प्रास्ताविक केले. शिबिरात विविध क्षेत्रात कार्यरत कर्तृत्ववान महिलांचा गौरव चिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

सन्मानित महिलांमध्ये वनिता राऊत, सुजाता नगराळे, नंदा वाकोडे, भागीरथी गुंरदे, रेखा गुजर, शुभांगी पवार, वैशाली मोकळकर, भाविका रामटेके, मीरा गणेशकर, लिना वीर, सुचिता पळसकर, ज्योती अलोणे, सुरेखा मनवर आणि संजीवनी बारी यांचा समावेश होता. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सहभागी सर्वांनी खास परिश्रम घेतले.

५
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार दि. १५ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## समाधान शिबिरातून नागरिकांच्या समस्या तातडीने मार्गी लावूया -विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल

**वाशीम :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या तातडीने मार्गी लावून शासनाच्या सेवा लोकांपर्यंत सुलभ आणि वेळेत पोहोचतील यासाठी प्रशासनाने समन्वयातून काम करावे, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी केले. त्या कारंजा तालुक्यातील खेर्डा बु येथे आयोजित करण्यात आलेल्या महाराजस्व अभियान समाधान शिबिराला भेट देऊन आढावा घेत असताना बोलत होत्या.यावेळी प्रभारी जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, सहाय्यक आयुक्त राजीव फडके, तुकाराम टेकाडे, उपायुक्त संतोष कवडे, उपजिल्हाधिकारी कैलास देवरे, तहसीलदार रवी महाले, गटविकास अधिकारी पुनम राणे, खेर्डा येथील उपसरपंच सिमाताई ढोके, माजी समाजकल्याण सभापती अशोक डोंगरदीवे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. सिंघल यांनी शिबिरामध्ये उपस्थित नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या महसूल विषयक अडचणी जाणून घेतल्या. विविध अर्ज व तक्रारींची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना त्यावर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. नागरिकांना प्रमाणपत्रे, नोंदी दुरुस्ती, जमीन संबंधित बाबी तसेच इतर महसूल सेवांचा लाभ जलद गतीने मिळावा यासाठी प्रशासनाने अधिक सक्रिय राहण्याची आवश्यकता त्यांनी यावेळी व्यक्त केली.

# ग्रामीण भागात कुठे झाला विकास, गावे असूनही भकास, पुढारी झकास !

● सिटी न्युज ब्यरो @ वाशीम ●

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर पुरोग्रामी मनविणाऱ्या महाराष्ट्रात आजही निवडणुका जातीपातीवर लढविल्या जातात. विकासाचे मुद्दे केव्हा हद्दपार झाले आहेत. गावाचा विकास कागदावरच झाला असून खऱ्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्याच नाहीत. त्यामुळे कुठे झाला विकास, गावे असूनही भकास, पुढारी मात्र झकास असे म्हणण्याची वेळ आली आहे.



जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतचा कार्यकाळ संपला असून ग्रामपंचायतीवर प्रशासकाची नेमणूक करण्यात आली आहे. निवडणुका जाहीर झाल्या नसल्या तरी ग्रामपंचायतच्या निवडणुकीचे घुमशान सुरू असताना भाऊ मेंबराले पांदन रस्ते दुरुस्त करायला सांगितले, नळाला पाणीपुरवठा, गावातील लाईट तसेच इतर कामासाठी दहा वेळा कळविले. सरपंचालाही सांगून बघितले, पाच वर्षात साधे कामही केले नाही. आता पुन्हा आपलं पॅनल उभा आहे म्हणतो, थांबा दाखवतो आता निवडणुकीत, असे संवाद गावागावात ऐकायला येत आहेत. थंडीत शेकोटीवर, पान टपरीवर ग्रामपंचायत निवडणुकीच्या गप्पा मधून सत्ताधाऱ्यावरील रोष व्यक्त होत आहे. निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच ग्रामपंचायतचे रणधुमाळी सुरू झाली. गाव पुढारी उमेदवारांना आता धरून बांधून काही ठिकाणी उमेदवाराची समजूत काढत आहेत. विरोधी गटाचा अंदाज घेऊन उमेदवार निश्चित झाले आहेत. गावागावात सध्या निवडणुकीच्या चर्चा सुरू असून पाच वर्षात न झालेल्या कामाचा रोष यातून व्यक्त होत आहे. लहान साहान समस्या असल्या तरी त्या सुटल्या नाहीत म्हणून तोंड सुख घेतले जात आहे. ग्रामपंचायततील भ्रष्टाचारापासून रस्ता, नाल्या, पथदिवे, अशा बाबीवरून धारेवर धरले जात आहे. मागच्या वेळी मत मागताना मोठा गोड बोलत होता. चांगले रस्ते करून देऊ, नाल्याची साफसफाई नियमित करू, नळाला दररोज मुबलक पाणी देईल, असे नाना प्रकारचे सांगत होता. विश्वास ठेवला, मत दिले, आता तुम्हीच सांगा पाच वर्षात काम केले काय ? एक धड्यागतीचे काम केले नाही अन् चालले पुन्हा मत मागायला, असे शब्द आत्ता रोजच ऐकायला येत आहेत. निवडणुका आहेत. सध्या जाऊद्या म्हणून गाव पुढारी दुर्लक्ष करीत आहेत.

### शिक्षित तरुणाचा पुढाकार

आपण भले आणि आपले काम भले, असे म्हणणारे सुशिक्षित तरुणही आता निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले आहेत. शिक्षण आणि स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी शहरात घिरट्या मारणारे तरुण आता गावात दिसू लागले आहेत. आपल्याच तोऱ्यात राहणारी आणि दुचाकीवरून फिरणारी ही मंडळी आता जमिनीवर आली असून, निवडणुकीत उत्साहाने भाग घेत आहेत.

### सरपंचपदाच्या उमेदवारीवरून रस्सीखेच

स्थानिक स्वराज्य व्यवस्थेत ग्रामपंचायतीला मोठे महत्त्व आहे. त्यातही सरपंच पद अति महत्त्वाचे, प्रत्येक गावात सरपंच होण्यासाठी अनेक जण गुडघ्याला बाशिंग बांधून तयार आहेत. गावातील प्रभावी पॅनल कडून निवडणूक लढविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे एका सरपंच पदासाठी दोन ते तीन जण रिंगणात उभे राहण्याची शक्यता दिसत आहे.

# पिस्तुल दाखवून जुन्या वादातून युवकावर प्राणघातक हल्ला !

## जीवे मारण्याचा प्रयत्न, पाच जणांवर गुन्हा

● सिटी न्युज ब्यरो @ वाशीम ●



शहरात जुन्या वादाचा वचपा काढण्यासाठी १३ मार्च रोजी धमकी देऊन त्यानंतर १४ मार्च रोजी पहाटे एका २६ वर्षीय युवकावर पिस्तूल रोखून खंजर आणि लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. या हल्ल्यात युवक जखमी झाला असून, भरवस्तीत झालेल्या या सशस्त्र प्रकारामुळे वाशिम शहरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी वाशिम शहर पोलिसांनी पाच आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार वैभव तुकाराम बोरकर (रा. शुक्रवार पेठ) आणि आरोपी राहुल ठाकरे, सचिन कोठेकर, वैभव गुंजकर, कृष्णा मार्गे व गौरव गवळी यांच्यात महिनाभरापूर्वी गाडी लावण्याच्या कारणावरून वाद झाला होता. हाच राग मनात धरून १३ मार्च रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास जेव्हा परळकर चौक परिसरातून लग्नाची वरात जात होती, तेव्हा आरोपींनी वैभवला गाठून मारहाण केली. 'तुला आज संपवूनच टाकतो, तू इथेच थांब तुला दाखवतो,' अशी धमकी देऊन आरोपी तिथून निघून गेले होते. धमकी दिल्यानंतर अवघ्या काही तासांतच, म्हणजे १४ मार्च रोजी पहाटे २ वाजेच्या सुमारास वैभव घरासमोर उभा असताना, पाचही आरोपी दोन दुचाकींवरून शस्त्रांसह तिथे पोहोचले. आरोपी वैभव गुंजकरने आपल्या कंबरेला लावलेली क्षपिस्तूल काढून वैभव बोरकरवर ताणली. त्याच वेळी गौरव गवळी याने हातातील क्ष्धारदार खंजरने वैभवच्या डाव्या बरगडीवर वार केला, तर सचिन कोठेकर याने लोखंडी पाईपने मांडीवर जबर प्रहार केला. इतर साथीदारांनी त्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. वैभवने जीव वाचवण्यासाठी आरडाओरडा केला असता, परिसरातील नागरिक घराबाहेर धावून आले. लोकांची गर्दी पाहून आरोपींची घाबरगुंडी उडाली. घाईगडबडीत आरोपी सचिन कोठेकर याने हातातील पिस्तूल स्कूटीच्या डिक्कीत टाकली आणि आरोपी आपली एक दुचाकी, पिस्तूल व लोखंडी पाईप घटनास्थळीच सोडून पळून गेले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत सदर साहित्य जप्त केले आहे.

या प्रकरणी वाशिम शहर पोलिसांनी वैभव बोरकरच्या जबानी रिपोर्टवरून राहुल ठाकरे, सचिन कोठेकर, वैभव गुंजकर, कृष्णा मार्गे आणि गौरव गवळी (सर्व रा. बाळसमुद्र, वाशिम) यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) आणि आर्म्स ॲक्टच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक गिरी करत असून, फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

## थोडक्यात

### वनोजा येथील पाणीप्रश्नावर चर्चा - खा. संजय देशमुख

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

वनोजा येथील तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांच्या वतीने खासदार संजय देशमुख यांच्या दिग्रस येथील निवासस्थानी भेट घेऊन गावातील पाणीप्रश्नाबाबत निवेदन सादर केले. सध्या गावामध्ये पिण्याच्या पाण्याची मोठी समस्या निर्माण झाली असून नागरिकांना पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

गावातील विहिरी व बोअरवेलमधील पाणी कमी झाल्यामुळे विशेषतः महिलांना व नागरिकांना दूरवरून पाणी आणावे लागत आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.दरम्यान, गावामध्ये ङकेंद्र शासनाच्या जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू आहे.ङ मात्र हे काम अद्याप पूर्ण झालेले नसल्यामुळे ग्रामस्थांना या योजनेचा लाभ मिळालेला नाही. परिणामी गावातील पाणीटंचाईची समस्या अधिकच गंभीर बनली आहे.या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी खासदार संजय देशमुख यांची भेट घेऊन जल जीवन मिशन अंतर्गत सुरू असलेले काम तातडीने पूर्ण करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे. खासदार संजय देशमुख यांनी या विषयाची गांभीर्याने दखल घेत महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरण विभागाच्या अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून चर्चा करून वनोजा येथील पाणीपुरवठा योजनेचे काम लवकर पूर्ण करण्याबाबत सूचना दिल्या. तसेच गावातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी प्रशासनाने तातडीने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले. यावेळी डॉक्टर सुनील राऊत पवन राऊत एकनाथ राऊत व ग्रामस्थ उपस्थित होते.

### जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यशाळेत तज्ज्ञांचा सूर



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

आपत्तीच्या प्रसंगी घाबरून न जाता योग्य पद्धतीने परिस्थिती हाताळल्यास अनेकांचे प्राण वाचवता येतात. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षण आणि जनजागृती अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन तज्ज्ञांनी जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यशाळेत केले.

जिल्हा नियोजन समिती सभागृहात आज दि. १३ मार्च रोजी एकदिवसीय जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली.या कार्यशाळेला निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, महसूल उपजिल्हाधिकारी विरेंद्र जाधव, विधी अधिकारी महेश महामुने, आयएमडीचे शास्त्रज्ञ डॉ. प्रविण कुमार, रवींद्र आखरे, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे पोलीस निरीक्षक जालिंदर फुंदे, राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे पोलीस उपनिरीक्षक एस. पी. बोदर, डी डी एम. एस. अनुराग पचोरी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत तसेच सहाय्यक अधीक्षक सुनील घोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यशाळेत राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) पुणे व राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ) नागपूरच्या अधिकारी व त्यांच्या चमूने प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून आपत्ती व्यवस्थापनाबाबत सखोल मार्गदर्शन केले. विविध प्रकारच्या आपत्तींच्या वेळी नागरिकांनी स्वतःचे तसेच इतरांचे प्राण कसे वाचवावेत याबाबत माहिती देण्यात आली.आयएमडीचे शास्त्रज्ञ डॉ. प्रविण कुमार यांनी हवामानातील बदल, कमी दाबाचे पट्टे, अतिवृष्टी, वादळे यांसारख्या नैसर्गिक घटनांबाबत माहिती दिली.

# जगण्याची कळ, महागाईची झळ !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



जीवनाश्यक वस्तूचे दर गगनाला भिडले. व महागाईची आग झपाट्याने पेटत आहे. त्यामुळे महागाईची झळ अन् जीवनाची कळ होत आहे. इंधन दरवाढीने जीवनावश्यक वस्तुचे दर गंगनाला पोहोचले आहेत. बांधकाम साहित्याच्या दरवाढीमुळे सर्व सामान्यांचे घराचे स्वप्ने अधुरेच राहत आहेत.

सध्या सणसुदीचे दिवस असून बाजारपेठेत सर्वच जीवनावश्यक वस्तु सह भाजीपाल्याचेही दर भरमसाठ वाढले आहेत. ग्राहकांची वर्दळ आहे. ग्राहकाच्या या उत्साहामुळे बाजारपेठ फुलल्या आहेत. शहरातील मोठ्या बाजारात सुवर्ण झळाळी असल्याचे चित्र दिसते. शेंगदाणे तेलाच्या दरात किलोमागे सरासरी ३० ते ४० रुपयांची वाढ झाली आहे. बाजारपेठेमध्ये गुळ, नारळ,हरभरा आणि तेलाची मोठी आवक झाली आहे. मात्र ग्राहकांना दरवाढीची झळ बसली आहे. घर बांधकाम करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याच्या भावात दुप्पट तिप्पट वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना घरबांधणे आवक्याच्या बाहेर झाले आहेत. २०२२ पर्यंत सर्वांना घरे देण्याचे मोदी सरकारचे आश्वासन हवेतच विगळले. इंधन दरवाढीमुळे जीवनावश्यक वस्तुत अचाणक वाढ झाली आहे.

# समन्वयातून प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करा - प्रभारी जिल्हाधिकारी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



जल जीवन मिशन, हर घर जल व स्वच्छ भारत मिशन या योजना नागरिकांच्या आरोग्य, स्वच्छता व मूलभूत सुविधांशी थेट संबंधित आहेत. त्यामुळे या योजनांची अंमलबजावणी काटेकोरपणे व गुणवत्तापूर्ण पद्धतीने करणे आवश्यक आहे. संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वय साधून सुरू असलेल्या कामांना गती द्यावी व प्रलंबित कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत. प्रत्येक घरापर्यंत स्वच्छ पिण्याचे पाणी आणि स्वच्छतेच्या सुविधा पोहोचविणे हे प्रशासनाचे प्राधान्य असून यासाठी सर्वांनी जबाबदारीने कार्य करावे,असे प्रतिपादन प्रभारी जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील यांनी केले.

१३ मार्च रोजी वाकाटक सभागृहात जल जीवन मिशन, हर घर जल व स्वच्छ भारत मिशन आदी कार्यक्रमांचा आढावा प्रभारी जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी घेतला.यावेळी ते बोलत होते.सभेला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे कार्यकारी अभियंता नितीन उपरेलू, जिल्हा भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे वरिष्ठ भूवैज्ञानिक वैभव श्रीरामे, पाणी व स्वच्छता मिशनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी धैर्यशील पाटील यांच्यासह संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित जिल्ह्यात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत विविध कामांना गती देण्यात आली आहे.सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत ५४३ कामे पूर्ण झाली असून १०३ कामे प्रगतीपथावर आहेत. कचरा व्यवस्थापन प्रकल्पांतर्गत मानोरा, मंगरूळपीर आणि कारंजा येथे कचरा व्यवस्थापन प्रकल्प कार्यान्वित झाले असून इतर तालुक्यांतील प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत, अशी माहिती पाणी व स्वच्छता मिशनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी धैर्यशील पाटील यांनी दिली. प्रलंबित कामे लवकरात लवकर पूर्ण करून मार्गी लावावीत, तसेच संबंधित यंत्रणांनी समन्वय साधून कामांना गती द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी पाटील यांनी यावेळी दिले.

# गटविकास अधिकाऱ्याचे वसुलीकडे लक्ष, कामाकडे दुर्लक्ष !

## * पूनम राणे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी
## * ग्राम सेवक दिपक रोकडे यांच्या बोगस अपंग प्रमाणपत्राची चौकशी झाली पाहिजे

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●



ग्राम सेवक दिपक पुंडलिक रोकडे हे गेल्या ११ वर्षापासून स्वतः अपंग असल्याबाबतचे खोटे प्रमाणपत्र लावून शासनाची दिशाभूल करुन आपल्या पगारामध्ये वेतन व अपंग भत्ता याचा आर्थिक लाभ घेतला आहे.पगरामध्ये आर्थिक लाभ घेवून शासनाचे लाखो रुपये लाटले आहे.याबाबतची तक्रार दिनांक २६/९/२०२५ रोजी किरण क्षार यांनी केली होती. तेव्हापासून आतापर्यंत हे प्रकरण गटविकास अधिकारी पुनम राणे याच्याकडून हे प्रकरण थंड बस्त्यांमध्ये ठेवण्यात आले. त्यानंतर या संदर्भात मुख्याधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांच्याकडे तक्रार करण्यात आली,त्यावर मुख्यअधिकारी जि.प.वाशिम यांनी गटविकास अधिकारी पुनम राणी मॅडम कारंजा यांना कारवाई करण्याचे पत्र दिले,परंतु या पत्रावर सुद्धा गटविकास अधिकारी कारंजा यांनी ठोस कारवाई न करता थातूर मातुर कारवाई करून या प्रकरणाचा निपटारा करण्याचा प्रयत्न केला, एवढे गंभीर प्रकरण असताना त्यांनी अशी कारवाई का केली यामध्ये काही देवाणघेवाण तर झाली नाही असा संशय व्यक्त होत आहे. यामुळे तक्रारदारांनी दिनांक १३/३/ २०२६ रोजी मुख्याधिकारी जि.प. वाशिम यांच्याकडे ग्रामसेवक दीपक रोकडे व गटविकास अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची तक्रार दाखल केली,ग्रामसेवक दीपक रोकडे हा दि.१३/०८/२०१४ रोजी जवाहर पंचायत समिती जि.पालघर येथे दिव्यांगाचे खोटे प्रमाणपत्र लावून प्रथम रुजू झाला होता.त्यानंतर ते दि.३०/०४/ २०२१ रोजी कारंजा पंचायत समिती अंतर्गत रुजू आहे.कारंजा पंचायत समितीमध्ये सुध्दा मागील ४ वर्षापासून शासनाची दिशाभूल करुन शासनाचे लाखो रुपये गडप करत आहे.त्यामुळे त्यांच्या फौजदारी गुन्हे दाखल करुन त्यांना निलंबित करुन कारवाई करण्यात मागणी तक्रारदारांनी केली आहे. दीपक रोकडे नावाच्या या ग्रामसेवकांनी अपंगाचे खोटे प्रमाणपत्र लावून शासनाची दिशाभूल करून अपंगाचा वेतन भत्ता लाटला,अपंगाचे प्रमाणपत्र त्याच्याजवळ आले कुठून कोणत्या डॉक्टरने त्याला अपंगाचे प्रमाणपत्र दिले याची सविस्तर चौकशी झाली पाहिजे त्यामुळे जिल्ह्यामधील असे अनेक प्रकार उघडकीस येऊ शकतात तेव्हा या प्रकरणाची जि.प. मुख्याधिकारी यांनी सखोल चौकशी करून संबंधित ग्रामसेवकाला निलंबित करून त्याच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावे जेणेकरून अश्या प्रकरणास आळा बसेल.


सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शनिवार दि. ७ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

ग्रामसेवकाचे स्व-दान, खोट्या प्रमाणपत्रातून लाटले अनुदान !

* ग्राम सेवक दिपक रोकडे यांने खोटे लाटला अपंग भत्ता
* गेल्या ११ वर्षापासून लाटत आहे अपंगाचे वेतन व भत्ता
* गटविकास अधिकारी यांनी ग्रामसेवकाची केली पाठराखण

## वाशीम शहरात...

# अवैध सावकारी, पडतंय गरीबांवर भारी !

***अवैध सावकाराकडून २० ते ३० टक्क्याने वसुली, अनेक कुटुंबे उध्वस्त * पोलिसांनी लक्ष देण्याची गरज**

● नाजीर शेख @ वाशीम ●



वाशीम शहरात अवैध सावकारांचा धुमाकूळ वाढत असल्याचे धक्कादायक चित्र समोर येत आहे. काही अवैध सावकारांकडून गरजू नागरिकांना तब्बल २० ते ३० टक्के व्याजदराने पैसे दिले जात असून या जादा व्याजाच्या व्यवहारामुळे अनेक कुटुंबे गंभीर आर्थिक संकटात सापडत आहेत. परिणामी अनेक परिवार उद्ध्वस्त होत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.दरम्यान, कर्जाच्या वाढत्या ओझ्यामुळे काही तरुणांनी टोकाचे पाऊल उचलत आपले जीवन संपविल्याच्या घटना यापूर्वीही घडल्या आहेत. त्यामुळे या प्रकाराकडे पोलिस प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन अवैध सावकारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे. वाशीम शहरात गरजूंना तातडीने पैसे देण्याच्या नावाखाली काही अवैध सावकार मोठ्या व्याज दराने पैसे वाटप करत आहेत. मात्र ठरलेल्या वेळेत व्याज न दिल्यास संबंधितांकडून महिलांशी तसेच तरुण युवकांशी अश्लील भाषेत बोलणे, धमकावणे आणि दादागिरी करून पैसे वसूल करण्याचे प्रकार समोर येत आहेत.काही सावकार तर उघडपणे 'कुठे जायचे ते जा, आमचे कोणी काही करू शकत नाही,' असे म्हणत धमक्या देत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे भीतीच्या वातावरणात अनेक लोक तक्रार करण्यासही पुढे येत नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

दरम्यान, काही नागरिकांनी पोलिसांकडे तक्रारी करण्याचा प्रयत्न केला असता तक्रार नोंदविण्यात टाळाटाळ होत असल्याचा आरोपही केला जात आहे.राज्यात वाढत असलेल्या अवैध सावकारीच्या प्रकारावर अधिवेशनात प्रश्न उपस्थित होताच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ॲक्शन मोडमध्ये दिसून आले. अवैध सावकारांनी दिलेले कर्ज कायद्याने मान्य नसून ते पूर्णपणे बेकायदेशीर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.यासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांनी नागरिकांना आवाहन करत सांगितले की, अवैध सावकारांकडून जर कोणालाही त्रास दिला जात असेल किंवा प्रताडित केले जात असेल, तर त्यांनी तात्काळ तक्रार करावी. अशा तक्रारी गंभीरतेने घेऊन संबंधित सावकारांवर कडक कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मात्र तरी काही मगरूर अवैध सावकार वाशीम शहरात २० ते ३० टक्क्याने व्याजाची रक्कम दादागिरीने वसुली करत आहे. या सुरू असलेल्या व्याजाच्या वसुलीला तरुण, महिला आणि ज्येष्ठ नागरिक त्रस्त झाले असून याआधी काहींनी तर टोकाचे पाऊल उचललेच्या घटना समोर आल्या आहे.त्यामुळे पोलिसांनी देखील अवैध सावकारी संदर्भात तक्रार आल्यास गांभीर्याने लक्ष देऊन कारवाई करावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# विज बिल भण्याचा सल्ला, सहाय्यक अभियंत्यावर हल्ला !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिम शहरात विज बिल वसुली आणि थकीत ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यासाठी गेलेल्या महावितरणच्या सहाय्यक अभियंतावर हल्ला झाल्याची घटना शनिवारी घडली. या प्रकरणी आरोपी प्रवीण मडके रा.वाशीम याच्या विरुद्ध वाशीम शहर पोलीस ठाण्यात विविध कलमाअन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सहाय्यक अभियंता मोबीन बशीर शेख रा.गुप्ता लेआऊट वाशीम यांनी दिलेल्या तक्रारीत नमूद आहे की. ते वाशीम येथे महावितरणच्या अर्बन भाग-०२ मध्ये सहाय्यक अभियंता म्हणून कार्यरत आहेत.दि.१४ मार्च रोजी मार्च एंडिंग असल्याने वरिष्ठांच्या आदेशानुसार थकीत वीज बिल वसुली मोहीम सुरू होती. त्यानुसार शनिवारी सकाळी सुमारे १०.३० वाजता मोबीन शेख आणि त्यांची टीमकडून थकीत बिलामुळे एका ग्राहकाचा वीजपुरवठा खंडित करून मीटर काढण्यात आले होते. यानंतर काही अंतरावर गेल्यावर प्रविण मडके नावाचा व्यक्ती तेथे आला. आणि 'माझ्या घरचे मीटर का काढले?' असा जाब विचारत शिवीगाळ सुरू केली. त्यानंतर 'थांब तुला दाखवितो' असे म्हणून तो तेथून जाऊन हातात लाकडी काठी घेऊन आला. आणि मोबीन शेख यांच्या डाव्या हाताच्या मनगटावर काठीने मारहाण केली. या मारहाणीमध्ये त्यांच्या मनगटाला सूज आली आहे.या प्रकरणी शासकीय कामात अडथळा निर्माण झाल्याने संबंधित आरोपी प्रविण मडके विरुद्ध विविध कलमाअन्वये वाशीम शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक झुंगे हे करीत आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

रविवार, दि. १५ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# चैत्र नवरात्रीच्या स्वागतासाठी राजेश्वर नगरी सज्ज

### ♦ विविध देवी मंदिरांची साफसफाई व रंगरंगोटीची कामे सुरू

प्रतिनिधी १५ मार्च

**अकोला :** या वर्षी चैत्र नवरात्र १९ मार्च रोजी सुरू होत आहे. यासाठी, सर्व विधी आणि शुभ मुहूर्तांचे पालन करून मंदिरे आणि घरांमध्ये कलश स्थापित केला जाईल आणि देवीची पूजा केली जाईल. चैत्र नवरात्र पाहता शहरातील बागातील देवी, गांधी चौकातील दुर्गा मंदिर हरिपेट परिसरातील सप्तशृंगी मंदिर तसेच अक्कलकोट रेणुका मंदिर किल्ला चौकातील संतोषी माता मंदिर व शहरातील प्रमुख देवी मंदिरांची साफसफाई व रंगरंगोटीची कामे सुरू झाली आहेत. शहरातील बाजारपेठ दुर्गा देवीच्या सजावटी आणि पूजा साहित्याने सजली आहे.



चैत्र नवरात्रासाठी घटस्थापना साहित्य खरेदी करण्यासाठी महिला पूजा साहित्य विकणाऱ्या दुकानांमध्ये गर्दी करताना दिसत आहेत. शहरातील अनेक दुकानांमध्ये दुर्गा देवीच्या सजावटीसाठी वापरल्या जाणाऱ्या



वस्तूंचा विस्तृत संग्रह आहे, ज्यामध्ये लाल चुनरी, बांगड्या, अत्तर, सिंदूर, पायाच्या अंगठ्या, मेंदी, काजळ, फुलांच्या माळा, कुंकू, बिंदी, हार किंवा मंगळसूत्र, पैंजण, नाकातील नथ, अंगठ्या, कानातले आणि कमरेतील पट्टे, तसेच विविध प्रकारचे कृत्रिम फुलांचे पेंडेंट यांचा समावेश आहे. दुकानदार दुर्गा देवीच्या पूजा साहित्यापासून तिच्या पोशाख आणि सजावटीपर्यंतच्या वस्तू विकत आहेत. नवरात्रात, दुर्गा देवीला लाल पोशाख आणि सजावट अर्पण केली जाते. देवीला लाल रंग आवडतो असे मानले जाते. यावेळीही चुनरीवर मोती, जरी आणि तारेचे सुंदर काम आहे.

दुर्गा मातेच्या लाल, आणि हिरव्या पोशाखां व्यतिरिक्त, लाल आणि भगव्या चुनरी, मेकअपच्या वस्तू, बांगड्या, त्रिशूळ आणि शाश्वत दिव्यांना मागणी आहे. लहान मुकुट, चुनरी, कमळाचा पट्टा, केसांचे बंधनवार इत्यादी वस्तूंची किंमत १०० ते ५०० रुपयांपर्यंत आहे. माताजींच्या नाकाची नथ आणि रंगीबेरंगी दगडांनी बनलेला कपाळाचा टिळक देखील मेकअपचा एक खास भाग आहे, ज्याची किंमत ८० ते ३५० रुपयांपर्यंत आहे. देवीच्या लाल चुनरीच्या बाजारात स्टार वर्क, जरी वर्क आणि मोत्यांचे काम प्रमुख आहे. एकंदरीतच माताराणीच्या स्वागतासाठी अकोला नगरी सज्ज झाली आहे.

# गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर नवीन वाहनांचे होणार आगमन

### ♦ ग्राहकांच्या स्वागतासाठी सजले शहरातील प्रमुख ऑटोमोबाईल शोरूम

प्रतिनिधी १५ मार्च

**अकोला :** वर्षातील सर्वोत्तम साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या गुढीपाडव्याला नवीन वस्तू घरी आणण्याची परंपरा आहे विशेषता नवीन वाहन नागरिक गुढीपाडव्याला खरेदी करतात गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर नवीन वाहन घरी आणण्याच्या परंपरेमुळे शहरातील ऑटोमोबाईल शोरूम ग्राहकांच्या स्वागतासाठी आकर्षक पद्धतीने सजवण्यात आले आहेत ऑटोमोबाईल डीलरच्या मते यावर्षी बुकिंग मध्ये गेल्यावर्षीच्या तुलनेत १५ ते २० टक्के वाढ दिसून येत आहे

**गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर अनेकांनी केली वाहनांची बुकिंग**

अनेक ग्राहकांनी नवीन वर्ष गुढीपाडव्याला वाहनांची डिलिव्हरी घेण्यासाठी अगोदरच बुकिंग सुरू केली आहे गुढीपाडव्याच्या सकाळपासून शहरातील शोरूम मध्ये नवीन वाहनांची पूजा आणि डिलिव्हरी सुरू होईल. दुचाकी बुकिंग ला यंदा जोरदार प्रतिसाद मिळत आहे. लोक अजूनही त्यांच्या आवडत्या वाहनांची चौकशी करण्यासाठी शोरूम मध्ये येत आहेत. यंदा इलेक्ट्रिक वाहनांची क्रेझ दिसून येत आहे पेट्रोल वाहनांसह, इलेक्ट्रिक दुचाकी आणि कारची मोठी मागणी आहे. एकूण बुकिंग मध्ये इलेक्ट्रिक व्हेईकलचा वाटा सुमारे १५ टक्के आहे. ग्राहकांच्या सुविधेसाठी शोरूम वर शून्य डाऊन पेमेंट, कमी व्याजदर ,आणि एक्सेसरीजवर लक्षणीय सुट यासारख्या ऑफर दिल्या जात आहेत. गुढीपाडवा हा



**आरटीओ कार्यालयातही वाढणार गर्दी**

◆एकाच वेळी वाहनांची डिलिव्हरी होणार असल्याने आरटीओ मध्ये नवीन नोंदणीसाठी कर्मचाऱ्यांवर कामांचा ताण येणार आहे अनेक लोकांनी आधीच मोठी रक्कम देऊन त्यांचे आवडते नंबर बुक केले आहेत

खरेदीसाठी वर्षातील सर्वात शुभ मुहूर्तां पैकी एक मानला जातो. त्यामुळे दुचाकी खरेदीदारांमध्ये मध्ये मोठा उत्साह आहे. वित्त कंपन्यांनी कागदपत्रांची प्रक्रिया देखील सोपी केली आहे. ज्यामुळे ग्राहकांचा उत्साह वाढला आहे. या महिन्यात शहरात दुचाकींची मोठ्या संख्येत विक्री होण्याची शक्यता आहे. यंदा अमेरिका इस्त्रायल इराण युद्धामुळे वाढलेले गॅसचे संकट आणि पेट्रोलच्या किमती वाढणार असल्याच्या शक्यतेने नागरिक इलेक्ट्रिक वाहनांना पसंती देत आहेत. गुढीपाडव्याच्या मुहूर्ताला बाजारपेठेत गर्दी आहे. दुचाकी बुकिंग वाढली आहे. तर चार चाकी वाहनांना ही जास्त मागणी आहे.

# संस्कृती संवर्धनासाठी रामनवमी शोभायात्रा समितीचे महत्व अधिक





प्रतिनिधी १५ मार्च

**अकोला :** स्व माजी आ. गोवर्धन शर्मा यांनी महानगराचे सांस्कृतिक व धार्मिक वैभव गतिमान करण्यासाठी रामनवमी शोभायात्रा समितीची मुहूर्तमेढ महानगरात रोवून ऐतिहासिक अशा रामनवमी शोभायात्रेला गती देण्याचा प्रयत्न केला त्यामुळेच विदर्भात महानगरातील रामनवमीची शोभायात्रा ही अव्वल दर्जाचे ठरली. विहिप-श्रीरामनवमी शोभायात्रा समितीच्या वतीने राणी सती धाम येथे गतवर्षी रामनवमी शोभा यात्रेत सहभागी देखावेकार, झाकीकार व भजनी मंडळांचा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला.रामनवमी शोभायात्रा समितीचे स्थायी अध्यक्ष कृष्णा गोवर्धन शर्मा यांच्या अध्यक्षतेत संपन्न सोहळ्यात विहिप महानगर अध्यक्ष राजू मंजुळकर,कोषाध्यक्ष राहुल राठी, राणी सती आधामचे अध्यक्ष जगदीशप्रसाद बाछुका, माजी नगरसेवक सिद्धार्थ शर्मा,धीरज खंडेलवाल, किशोर मांगटे पाटील,विलास अनासाने,मनीष बाछुका, महिला शाखेच्या सौ अर्चना शर्मा,सौ पुष्पाताई वानखडे, चंदाताई शर्मा, सिमरन अम्मा आदी उपस्थित होते.मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्रीराम तथा माजी आ स्व गोवर्धन शर्मा यांच्या प्रतिमा पूजनाने या कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. यावेळी रामनवमी शोभायात्रेत सहभागी झालेले ४५ झाकी मंडळे, ५५ महिला दिंडी मंडळे, १० पुरुष दिंडी मंडळे तथा १० घोडेस्वार यांना मोमेंटो तथा शाल श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. या पारितोषिक वितरण कार्यक्रमात सहभागी विविध भजनी मंडळाच्या मातृशक्तींनी यावेळी श्रीरामाचा जयघोष करीत जल्लोष साजरा केला.आपल्या प्रास्ताविकात विहीप बजरंग दलाचे सुरज भगेवार यांनी रामनवमी शोभायात्रा समितीच्या रामनवमी उत्सवाची माहिती दिली.तर स्वागतपर मनोगत समितीचे अध्यक्ष अरुण शर्मा यांनी व्यक्त केले. पाहुणे परिचय संदीप वाणी यांनी दिला.संचालन बाळकृष्ण बिडवई,मनीषा भुसारी यांनी तर आभार नितीन जोशी यांनी मानलेत.या पारितोषिक वितरण सोहळ्यात यावेळी नवीन गुप्ता, सुमित शर्मा, जुगल खंडेलवाल, दीपक मायी, कैलास रणपिसे, अनिल शुक्ला, हर्षद चाल्स,डॉ विजय शर्मा,अक्ष पटेल,विक्की तिवारी, पवन शर्मा, एड,सौरभ शर्मा,एड, गिरिराज शर्मा, रेखा नालट, सरला देशमुख,कल्पना अडचुले, दिपाली वराडे,संगीता मानकर,मनीषा देशपांडे,मीरा वानखडे, संतोषी शर्मा,मुक्ता पापडे, चित्रा फाफट, वैशाली शेगोकार, मुक्ता पुरी, सुनंदा गावंडे, चित्रा खेलपांडे, आशा वळस्कर, दिपाली शिंदे, मालती रणपिसे, समवेत समवेत विहिप-रामनवमी शोभायात्रा समितीचे बहुसंख्य सेवाधारी उपस्थित होते.



# दक्षिण मध्य रेल्वे प्लॅटफॉर्मवर पाण्याचा तुटवडा अन् अपव्यय दोन्हीही



प्रतिनिधी १५ मार्च

**अकोला :** रेल्वे स्थानकाच्या दक्षिण मध्य रेल्वे प्लॅटफॉर्मवर पाण्याची नासाडी तसेच काही टॅब बंद असल्याने विचित्र स्थिती निर्माण झाली आहे. सध्या तीव्र उन्हाळा आहे. एकीकडे प्रवाशांना पाण्यासाठी धावपळ करावी लागते तर काही लोक येथील पाणी आंघोळीसाठी वापरतात. याकडे स्टेशन प्रबंधक लक्ष देतील का अशी मागणी केली जात आहे.

पाणी व्यवस्थित वापरले तर सर्वांना ते उपलब्ध होऊ शकते. तसेच प्लॅटफॉर्मवरील जे टॅब बंद आहेत त्यांची दुरूस्ती करण्यात यावी. अकोला हिंगोली मार्गाने जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे. तसेच लांबचा प्रवास असल्याने प्रवाशांची पाण्यासाठी तारांबळ होऊ नये. कारण हा प्लॅटफॉर्म अगदी शेवटी आहे. पहिल्या प्लॅटफॉर्म पासून हे अंतर बरेच आहे. त्यामुळे पाण्याची व्यवस्था होणे आवश्यक आहे. अन्यथा प्रवाशांची धावपळ होते.

# प्रतिबंधित डिस्पोजेबल कप विक्री करणाऱ्या व्यावसायिकाला १० हजार रूपयांचा दंड



प्रतिनिधी १५ मार्च

**अकोला :** मनपा आयुक्त डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा उपायुक्त विजय पारतवार आणि स्वच्छता विभाग प्रमुख प्रशांत राजुरकर यांच्या मार्गदशनात १४ मार्च रोजी प्रभाग १८ मधील होलसेल किराणा बाजारात अस्वच्छता तसेच प्रतिबंधित वन न्यूज प्लास्टिक तपासणी दरम्यान मोती ट्रेडर्सची पाहणी दरम्यान चहाच्या कपाचा साठा मोठ्या प्रमाणात आढळला. विक्रेत्याला दंड करण्यात आला.

महानगरपालिका अधिनियम १९४९ तसेच पर्यावरण संरक्षण कायदा २०१८ व २०२१ अनुषंगाने द्वितीय दंड रुपये १००००/- ची दंडात्मक कारवाई करण्यात आली. मनपा पश्चिम झेन कार्यालयाचे सहा.आयुक्त गजानन घोंगे, वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक अमर खोडे वरिष्ठ, स्वच्छता निरीक्षक मनोज सारवान, सचिन आखरे, आदर्श गोहर, राजेश सारवान, रवी महोत यांच्या पथकाने कारवाई केली.

# महात्मा गांधी विद्यालयात स्वच्छतेचा बोजवारा ! पाण्याची उधळपट्टी

प्रतिनिधी १५ मार्च

**हातरूण:** महात्मा गांधी विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालयात गंभीर प्रकार समोर आले आहेत. शाळेत स्वच्छतेचा अभाव, पाण्याची उधळपट्टी आणि काही शिक्षकांची गैरहजेरी यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिक आणि पालकांकडून केला जात आहे.

महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात ग्राम पंचायतीमार्फत पाणीपुरवठा केला जातो. मात्र नळ सुरू झाल्यानंतर पाण्याच्या टाकीकडे लक्ष देणारे कोणीही नसल्याने टाकीतून पाणी सतत वाहत राहते आणि मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होत असल्याचे चित्र दिसत आहे.

कडाक्याच्या उन्हामुळे आधीच



परिसरात पाणीटंचाईचे सावट आहे. याकडे शाळेच्या मुख्याध्यापकांचे दुर्लक्ष होत असल्याचेही बोलले जात आहे. याशिवाय काही ठिकाणी शिक्षकांकडून विद्यार्थ्यांकडूनच कामे करून घेतली जात असल्याचेही चित्र दिसत आहे, ज्यामुळे पालकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. दरम्यान शासनाने सर्व शाळांमधील शिक्षक व कर्मचाऱ्यांना नियमित उपस्थित राहण्याचे स्पष्ट आदेश दिले असतानाही हातरूण, सिंगोली, मालवाडा, खंडाळा, बोरगाव वैराळे, कारंजा, रमजानपूर आणि कंचनपूर परिसरातील काही शाळांमध्ये शिक्षक अपडाउन करत असल्याचे बोलले जात आहे. काही शिक्षक शाळा सुरू असतानाही शेतात, हॉटेलमध्ये किंवा स्वतःच्या व्यवसायात व्यस्त असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. तर काही शिक्षक शाळेत येऊन फळ्यावर काही शब्द लिहून बाहेर गप्पा मारत बसतात, अशी तक्रार पालकांनी केली आहे. या निष्काळजीपणामुळे गरीब व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे मोठे नुकसान होत असल्याचे पालकांचे म्हणणे आहे. विद्यार्थ्यांना माध्यमांसमोर बोलण्याची भीती वाटत असून मुख्याध्यापक त्रास देतील अशी भीती त्यांच्यात असल्याचेही सांगितले जात आहे.या सर्व प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी हातरूण आणि परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# राष्ट्रीय लोक अदालतीत 8337 प्रकरणे निकाली

### ♦ २७ कोटी ८१ लाख रुपयांची तडजोड

प्रतिनिधी १५ मार्च

**अकोला :** १४ मार्च २०२६ रोजी अकोला जिल्हयातील सर्व दिवाणी व फौजदारी न्यायालये तसेच कामगार न्यायालय, सहकार न्यायालय, कौटुंबीक न्यायालय, औद्योगिक न्यायालय व जिल्हा ग्राहक तकार आयोग, अकोला येथे राष्ट्रीय लोक अदालतचे आयोजन करण्यात आले.

अकोला जिल्ह्यातील सर्व न्यायालयात प्रलंबित प्रकरणापैकी एकूण १२७९१ प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतमध्ये तडजोडीकरीता ठेवण्यात आली होती. त्यापैकी २२१५ प्रलंबित प्रकरणात व ६१ दाखलपुर्व प्रकरणात समेट घडुन आली. अशी एकूण ८३३७ प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामध्ये मुख्यत्वे दिवाणी, फौजदारी, वैवाहीक वाद स्वरूपाची तसेच मोटार वाहन अपघात प्रकरण व कलम





१३८ एन.आय. ॲक्ट आणि ग्रामपंचायतचे घरपट्टी/पाणीपट्टी तसेच महावितरण व बँकांची खटलापूर्व प्रकरणात तडजोड होऊन २७ कोटी ८१ लाख ४६ हजार ४८३ ची तडजोड झाली. आपसी सहमतीने घटस्फोट घेणारे पती-पत्नी चे एकुण ०४ जोडपे नांदण्याकरिता गेले. त्यामध्ये महत्वाची बाब म्हणजे एका प्रकरणामध्ये पती पत्नी मध्ये असलेल्या वादाबाबत मागील ५० वर्षापासून प्रकरणे प्रलंबित होती ती प्रकरणे लोकन्यायालयाच्या माध्यमातून निकाली निघाली. तसेच मॅक्टची प्रकरणे देखील मोठ्या प्रमाणात निकाली निघाली. लोक न्यायालय यशस्वी होणेकरीता एस. बी. कचरे तत्कालीन अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा तत्कालीन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अकोला तसेच ए. डी. क्षीरसागर, प्रभारी अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अकोला तसेच दि. शं. दाभाडे, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला यांचे बहुमुल्य मार्गदर्शन लाभले. तसेच जिल्ह्यात कार्यरत सर्व न्यायाधीश, न्यायालयीन कर्मचारी, वकील यांचे योगदान लाभले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सर्वश्री यु. आर. वाडेगावकर, अधीक्षक, पी.एम. बलिंगे, सहा. अधीक्षक संजय व्ही. रामटेके, पी.एल. भगेवार, कार्यालयीन सहायक., वैभव ताथोड, व हरिष इंगळे, धीरज मारके व विधी सेवा प्राधिकरणाचे लिपीक आणि शिपाई तसेच लोक अभिरक्षक कार्यालयातील विधीज्ञ आणि न्यायीक कर्मचारी, विधी स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

लोक अदालत यशस्वी पार पाडणेकरिता अकोला बार असोसिएशन तसेच पोलिस अधीक्षक कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय यांचे सहकार्य लाभले, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव/न्यायाधीश दि. श. दाभाडे यांनी दिली.

# अनोळखी इसम मृतावस्थेत आढळला!

प्रतिनिधी १५ मार्च

**ओळख पटविण्याचे पोलिसांचे आवाहन**

**अकोला :** शहरातील मानेक टॉकज जवळील गल्लीत अंदाजे ५० वर्षी इसम १४ मार्च रोजी सकाळी १०.३० वा. मृतावस्थेत आढळून आला. याबाबत विनायक शाहीवाले रा. शिवाजीनगर जुने शहर अकोला यांनी दाखल केलल्या फिर्यादीवरून बीएनएसचे कलम १९४ नुसार रामदोस पेठ पोलिस ठाण्यात मर्ग दाखल केला आहे. सदर इसमाचे वय अंदाजे ५० ते ५५ असून, बांधा सडपातळ, वर्ण गोरा, चेहरा लांबट, उंची ५.६ फुट, केस काळे-पांढरे, उजव्या हातावर आरडीएस 'रितेश' असे गोंदलेले असून, भुरकट पांढरे मळकट शर्ट व काळ्या रंगाची जिन्स पँट आहे. अशा वर्णनाच्या इसमाची ओळख पटल्यास त्यांच्या नातेवाईकांनी किंवा ओळखीच्या लोकांनी रामदास पेठ पोलिस स्टेशन, अकोला येथे संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांच्यावतीने करण्यात आले आहे.

# नाईक होमिओपॅथीमध्ये होतोय असाध्य आजारांवर उपचार

### ♦ ॲडव्हान्स होमिओपॅथी ट्रीटमेंट रुग्णांसाठी फायदेशीर

प्रतिनिधी १५ मार्च

**अकोला :** येथील प्रसिद्ध डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये थायरॉईड, लठ्ठपणा, ॲसिडिटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधिवात , मायग्रेन सारख्या असाध्य आजारांवर उपचार घेऊन रुग्ण आता निरोगी जीवन जगत आहेत. ॲडव्हान्स होमिओपॅथीच्या





उपचारामुळे आतापर्यंत हजारो रुग्णांना मोठा फायदा झाला आहे.

गेल्या ४० वर्षांपासून डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये शरीराच्या सर्व आजारांवर संपूर्ण आणि यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रुग्णांना इतर ठिकाणी उपचार घेऊनही फरक पडलेला नाही, अशा रुग्णांनी एकदा येथे नक्कीच भेट दिली पाहिजे.अधिक माहितीसाठी रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक ९१७५९५७१२९ किंवा ९१३००१६१२९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तसेच ॅन्व्द्स्दार्द्र्फ़्ब.म्द्स (Youtube) वर अधिक माहिती मिळवू शकतात. येथे उपचार घेऊन पूर्णपणे बऱ्या झालेल्या एका महिला रुग्णाने आपला अनुभव व्यक्त केला आहे. माझे नांव सुजाता, मी नाईक होमिओपॅथी येथे येण्याअगोदर माझ्या अंगावर खूप सुज होती. लवकर उठायला येत नव्हते. हाडांना खूप कडकपणा आला होता. गर्भाशयाच्या पिशवीला सुज होती. मी नाईक होमिओपॅथी येथे उपचार सुरू केल्यानंतर मी आता खुप आनंदी जीवन जगत आहे. नाईक होमिओपॅथीच्या उपचाराने मी पूर्णपणे समाधानी आहे.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724 - 2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK